सहामाही ,, २ ,, ८८
साल अखेर ,, ७ ,, १ ८८
किरकोळ अंकास ..........................८४

नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस.........८१ ८९
दुसरे खेपेस .... ........८१

Six monthly......... 3 .............. 8 as
Single copy ............................ 4 as

Advertisement
Below 10 lines ...... 2 Rs
Per line over 10 ......4 as
Repetition Per line, ..3 as

REGISTERED N. No.

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOL XXXVI AKOLA MONDAY 3 MARCH 1902 NO 9

वर्ष ३६ आकोला सोनवार तारीख ३ माहे मार्च सन १९०२ इ० अंक ९


कि० दिवाणी दावा नंबर २ सन १९०२ क्लास २१

कोणी स्थानापन्न होतो तेव्हां त्याजला कर्ज वसूल करण्या बद्दल सरटीफिकीट देण्याचा कायदा आक्ट नंबर ७ सन १८८९ यांतील कलम ७ अन्वये नोटीस.

विद्यमान विश्वनाथ नारायण दांडेकर साहेब सिव्हिल जडज्य अकोला यांचे कोर्टात. अर्जदार सिताराम बापुजी मुजुमदार राहणार शेगांव ता० खामगांव.

सर्वांस या नोटिशीनें कळविण्यांत येतें कीं, वरील अर्जदार यानें मयत बापूजी गोपाळ मुजुमदार स्टेशन मास्तर अकोला याचे गव्हर्मेंट लाईफ इनस्युरंस कंपनीकडे येणे असलेले रुपये १७०४८७. पॉलिसी नंबर १६९७८ याचे कर्ज वसूल करण्या करितां सरटिफिकीट मिळावें ह्मणुन तारीख १७ माहे २ सन १९०२ इसवी रोजीं अर्ज केला आहे. व त्या अर्जाचे चौकशीची तारीख १९ माहे ३ सन १९०२ इसवी रोजीं मुकरर केली आहे तर सदरहू दिवशीं १० वाजतां तुह्मी आपले दस्तऐवज वगैरे सुद्धां आमचे कोर्टात, अर्जदार याजला का सरटिफिकीट देऊं नये याचे कारण दाखविण्या करितां, हजर व्हावें. माझे सहीनिशी व कोर्टाचे शिक्क्यानिशीं नोटीस देण्यांत आली आहे. आज तारीख २८ माहे २ सन १९०२

V. N. Dandekar
Civil Judge
Akola.

---

## भारत भाग्योदय अथवा सौन्याचा दिवस

नं. ९

शिवाजी महाराजास विशेष आग्रह करणें आतां अगदीं निरुपयोगी आहे असें जेव्हां पेशव्यांच्या लक्षांत आलें तेव्हां त्यांनीं तो नाद सोडून दिला.

शिवाजी— मोरोपंत आमच्या वडिलांचे आपण खरे दोस्त. आपणांस मी त्यांच्याच जागीं समजतों. आजच्या कार्यांत यश प्राप्त व्हावी ह्मणून आपणा सर्वांस मी आशीर्वाद मागतों आहें.

हें भाषण ऐकून पेशवे, आबाजी, आणि तानाजी यांचे डोळे पाण्यानें भरून आले. आणि सर्वांनीं शिवरायास सद्गदित अंतःकरणानें आशीर्वाद दिले. नंतर शिवाजी महाराज आपले जिवाचे कलिजे जे मावळे लोक त्यांजकडे वळून ह्मणाले, तानोजी ! जासोजी ! तुह्मीहि माझें अभिष्ट चिंताल ना?

तानोजी— आपलें चरण अंतरण्यास आह्मी कोणतें पाप केलें आहे ? तुमची व आमची तुटातूट एका तरी ठिकाणीं आजपर्यंत झाली आहे काय ? महाराज जरा विचार करा, आणि पाहा, कोंकणांतील डोंगर तून दऱ्याखोऱ्यांतून मजशिवाय आपणाजवळ कोणी तरी होतें काय ? त्या दिवशींच्या रात्रींच्या भयंकर वेळीं ज्या वेळीं आपणावर भयंकर प्रसंग गुदरला होता त्यावेळीं मीच ना माझा जीव धोक्यांत घातला ? बाजी फसलकर आपल्या सेवेंत असतांनाच मरण पावला त्या प्रमाणेंच हा तानोजी हातांत शीर घेऊन आपल्या दोस्ताच्या बरोबर अग्नींतही उडी घालावयास भिणार नाहीं मग दुसरें काय ? महाराज, जय आला तर उत्तमच आहे नाहीं तर यजमानाशिवाय या जागीं उपभोग घेण्यांत मग्न होणारा निमकहराम मी नव्हे बरें ! (अश्रूंनीं डोळे भरून आले.)।

तानोजीचे डोळे पाण्यानें भरून आले व त्याच्यानें एकटें राहावणार नाहीं हें समजून

शिवाजी— दोस्तानों जगांत असें कांहीं नाहीं कीं, मी ज्याकरितां तुह्माला नाखूष करीन. हॉं. आटपा. करा तयारी. चला. निघा.

या नंतर शिवाजी महाराज आपल्या अंतःपुरांत आले शिवाजीची मातोश्री जिजाबाई आपल्या मुलाच्या खोडकर वर्तणुकीच्या विचारांत मग्न होती व शिवराय कधीं ताळ्यावर येईल या विषयींच्या कल्पना तिच्या मनांत येत असतांना एकदम शिवाजी आंत गेले.

शिवाजी—मातें, चरणीं वंदन करतों, परवानगी असावी.

जिजाबाई—बाळा, मला एकवार कडकडून भेट. शिवराय, तुझा खोडकरपणा आणि तुझ्या वरचीं संकटमालिका केव्हां जाईल आणि मला या काळजींतून कधीं मुक्त करशील ?

शिवाजी—मातोश्री! तुझ्याच कृपाप्रसादानें आजपर्यंत तुझा मुलगा सर्वत्र ठिकाणीं विजयी झाला आहे असें असून आजच पराजित कसा होईल? (डोकें ठेवितो)

जिजाबाई— बाळा! (पाठीवरून व डोक्यावरून हात फिरवून) श्री जगदंबा तुझी काळजी वाहणारी आहे तीच तुला सर्व संकटांतून सदोदित मुक्त करो. (असें ह्मणत आहे तोंच तिचे नेत्रांतून खळखळ अश्रू वाहून शिवरायाचे मस्तकीं पडले.) शिवाजी महाराजास आजपर्यंत असा हुंदका कधींही आला नव्हता अशा हुंदक्यानें—

शिवाजी— मातोश्री! मी तुलाच देवी समजतों. माझ्या जिवांत जीव आहे तोंपर्यंत मी तुझी देवी प्रमाणेंच पूजा करीन. तूं मला आशीर्वाद दिलास कीं मी कोणत्याही संकटाला भीक घालणार नाहीं.

जीजाबाईचें डोळ्याचें पाणी खळेना; नेत्रांतून सारखे अश्रू चालत आहेत.

जिजाबाई—जा, शिवराया— तुं इच्छित कार्याकरितां जा. जगदीश्वर तुझें रक्षण करो. माझें वाडवडील देवगडचे रक्षक होते. हिंदुधर्माचा पाळक तूंच आहेच. मग तुजाच मी येथें ठेवून घेऊन कसें चालेल? शिवराया, हिंदू धर्माचा ध्वज तूंच फडकावण्यास समर्थ आहेस.

सर्व तयारी झाली. शिवराय घोड्यावर स्वार झाले. आणि सर्वां समवेत किल्ल्याच्या दरवाजा बाहेर आले. किल्ल्याच्या पायऱ्या उतरत आहेत तोंच एक जवान मर्द शिपाई समोरून आला. आणि मुजरा करून उभा राहिला.

शिवाजी—कोण? रघुनाथजी हवालदार? कां या वेळीं काय काम आहे?

रघुनाथजी— महाराज! ज्या दिवशीं तोरणा किल्ल्यांतून मी आपल्या पत्रांची उत्तरें घेऊन आलों त्याचवेळीं आपण मला कांहीं बक्षीस देण्याचें कबूल केलें आहे ?

शिवाजी—होय, खरें, पण याच वेळीं तुला काय बक्षीस पाहिजे ?

रघुनाथजी—महाराज दुसरें काय ? आपल्या बरोबर येण्याची परवानगी हेंच बक्षीस पाहिजे. पांच पंचवीस मावळे लोक हाताखालीं घेऊन आज मी पुण्यांत आपल्या बरोबर शिरणार.

शिवाजी—अरे ? जाणून बुजून आगींत पाय टाकण्यास का धजतोस ? तुझा जीव तुला जास्त कां झाला आहे ?

रघुनाथजी—तें कांहीं असो. मेलों तर त्याची पर्वा नाहीं. पण मी आपल्या बरोबर येणार.

शिवाजी—ठीक आहे. चलावें.

(पुढें चालू)

---

## वसुधैव कुटुंबकम्

भूतदयेचीं प्रतिबंधकें

नंबर २

आतां, भूतदयेस प्रतिबंधकें कोणतीं आहेत हे पाहूं जातां, भिन्न धर्म, भिन्न शिक्षण भिन्न भाषा, भिन्न रीतिरिवाज, भिन्नजाति इत्यादिकांकडे नजर पोंचते. हीं प्रतिबंधकें दूर करण्याचे उपायांचा निराळा विचार करण्यापेक्षां, सांप्रत भरतखंड हें एक राष्ट्र बनण्याचीं सुचिन्हें दिसत आहेत त्यांच्याच आपण विचार करूं. व वरील उपायाची आंत कितपत योजना झाली आहे व त्यामुळें वर दर्शविलेल्या प्रतिबंधकांचें दूरीकरण किती होत आहे तें आपण पाहूं. हें पाहणें ह्मणजे विषयांतर केलेंसें वाटेल तरी वस्तुतः तें विषयांतर नाहीं.

आणखी असा विचार सुचतो कीं, वर दाखविलेले धर्म, भाषा, शिक्षणादि निरनिराळे प्रकार भूतदयेचे प्रतिबंधक समजण्यापेक्षां भूतदयेच्या अभावाचे ते परिणाम होत असें समजणें अधिक सयुक्तिक होईल. ह्मणजे भूतदयेच्या अभावामुळेंच हे प्रकार उत्पन्न झाले आहेत.

पुढील विचार करण्यापूर्वीं हिंदुस्थान देश हें एक राष्ट्र बनणें इष्ट आहे कीं नाहीं असा प्रश्न करावा लागेल. व तें इष्ट आहे व आवश्यक आहे असें याचें उत्तर गृहीत धरण्यास बाध दिसत नाहीं.

असें आहे तर आह्मी सांगतो कीं, पुढील गोष्टींचा विचार केल्यानें कल्पनाशक्ति व दृष्टीच्या शक्तीची मर्यादा यांची फार मोठी वृद्धि होईल. मनाचा संकुचितपणा व आपल्या पुर्ती दृष्टि, यांच्या योगानें वसुधैवकुटुंबकम् यांतील अर्थ कसा साधेल ?

या भरतखंडावर विद्याव्यासंगी, न्यायी व दयाळू इंग्रज सरकारचें राज्य आहे ही ईश्वरी प्रसादाची उत्तम साक्ष होय. या देशांतील लोक एकंदरीनें पाहतां अज्ञानामुळेंच दैन्यदशा पावले आहेत. त्यांच्यावर चोहीकडून होत असलेले हल्ले सांप्रतच्या प्रभुत्वामुळेंच बंद झाले आहेत. जर हें एक राष्ट्र कधीं बनणेंच असेल तर तें याच सार्वभौमत्वाखालीं बनेल असें दूरदर्शी जनांस वाटत आहे. एक राष्ट्र बनण्यास एक छत्री राज्याची जशी अवश्यकता आहे, तशीच, पूर्वीं ह्मटल्याप्रमाणें, एकच भाषा, एकच धर्म, एकच शिक्षण वगैरेंची आहे. सर्वांचा हितसंबंध एकच आहे अशी समजूत झाल्याशिवाय एक राष्ट्र बनणें ह्मणजे भूतदया उत्पन्न होणें शक्य नाहीं. आणि अशी समजूत होण्यास बहुविध धर्मपंथ, आणि भिन्न भाषा या प्रधान अडचणी होत.

एखाद्या मोठ्या द्वीपकल्पांत राहणारा हिंदुंचा धर्म एक आहे असें ह्मणतां येत नाहीं. आणखी, हिंदुधर्म हें एक नांव मात्र आहे बाकी हे सर्व भिन्न भिन्न रूढींचे व पंथांचे परिणाम असून तितके निराळे धर्मच होत. यावरून दिसून येईल कीं, हल्लींचा हिंदुधर्म हा राष्ट्रीय धर्म होऊं शकत नाहीं व राष्ट्र बनण्यास धर्म तर एक पाहिजे. इस्लामी धर्म आह्मास मान्य नाहीं. ख्रिस्ती धर्मही कबूल नाहीं, व व अन्य धर्मांविषयींही आमची संमति नाहीं. तर आह्मी करावें काय हा मोठा बिकट प्रश्न व बिकट प्रसंग आहे. पण याचाहि निकाल सोप्या मार्गानें होण्यास जागा आहे. प्रस्तुत ज्याला आपण धर्म असें ह्मणतो तो धर्म नसून रूढि आहे आणि तिचा वेदांशीं विरोध आहे. यास्तव बऱ्याच अंशानीं वेदोक्त धर्मांचा आश्रय करून, देशांतील बुद्धिमत्तेचें, चातुर्याचें व योजनेचें हीं सर्व सामर्थ्यें एक करून राष्ट्रीयत्वदर्शक विशिष्ठ चिन्हांकित सर्व साधारण असें धर्मास स्वरूप दिल्यास या संकटांतून आपण मुक्त होऊं. पंडित दयानंद सरस्वती सारखे धर्मशास्त्रविशारद ह्मणतात कीं, मूर्ति-

पूजा सोडिली तर आपलें कार्य होईल. हिंदुपणा जाणार नाहीं, बुद्धि जाग्यावर राहील, सद्विचार सुचतील, मानसिक धैर्य येईल, इहलोक व परलोक काय तें समजेल, इहलोकचें जीवन काय, संसार कसा व कशा करितां करावा याचा बोध होईल, व कर्तव्याचा उलगडा होईल. पंडितांचें हें ह्मणणें विचार करण्या सारखें आहे. तसेंच धर्म या नांवास जीं अनेक उपकरणें व अनंत खटपटी जोडल्या आहेत आणि ज्यांच्या भारामुळें बोलण्यास किंवा जाग्यावरून हलण्यास धर्मास शक्ति राहिली नाहीं, त्यांविरहित वेदोक्त धर्म आहे, आणि तो आपल्या पूर्वजांनीं आपल्या करितां दयायुक्त अंतःकरणानें करून ठेविला आहे, त्याचा अज्ञानानें अव्हेर करून आपण इकडे तिकडे भटकतों, त्याचें हें फळ होय. धर्म ह्मणा, किंवा धर्मपंथ ह्मणा, त्यांत भिन्नता असली तर तेथें भूतदया उत्पन्न होईल किंवा परस्परांत वैरभाव निरंतर जागृत राहील, याचा निर्णय शैव आणि वैष्णव यांच्यांतील हाडवैर व मारामाऱ्या, या एकाच उदाहरणावरून करितां येईल. असे धर्मपंथ या देशांत अगणित आहेत तेव्हां त्यांच्यातून परस्परां विषयींचा कळवळा ( भूतदया ) पळून दूर गेल्यास आश्चर्य नाहीं.

वऱ्हाडसमाचार

मिती माघ वद्य ९ शके १८२३

## लेडी डफरिन फंड

' लेडी डफरिन फंड ' हें नांव पुष्कळांच्या परिचयांतलें आहे. या नांवाची एक संस्था आहे. तिची स्थापना लोकाश्रयावर करण्यांत आली आहे. या संस्थेला राजाश्रयही अप्रत्यक्ष आहे. अलिकडे थोड्या दिवसापूर्वीं जे महा मुत्सदी लार्ड डफरिन निवर्तले त्यांच्या पत्नी डफरिनबाई यांचेंच नांव या संस्थेला दिलेलें आहे. लार्ड डफरिन व्हाइसराय होते तेव्हां इंडियांत ही संस्था उभारण्यांत आली. अर्थात् अशा महा पुरुषानें ज्या गोष्टीचा संकल्प केला ती गोष्ट स्वल्प काळांत नांवारूपास आली आणि लक्षावधी रुपयांची वर्गणी जमा होऊन वरील नांवाची संस्था चालूं झाली. ही संस्था सर्वव्यापी आहे. हिचा विस्तार सर्व देशभर आहे. वऱ्हाड प्रांतात हिची प्रांतिक शाखा आहे. या शाखेला स्थापन होऊन गेल्या डिसेंबरच्या १ ले तारखेला सोळा वर्षें पुरीं झालीं. स्त्रियांस वैद्यकशास्त्र शिकवावें, स्त्रियांपैकीं कांहीं जणांस डाक्टरणीचा धंदा करण्यास लावावें आणि स्त्रीवर्गास वैद्याची मदत देण्यासाठीं व औषधोपचार करण्यासाठीं स्वतंत्र दवाखाने स्थापित करावे असा या संस्थेचा मूळ उद्देश आहे. त्या उद्देशाला अनुसरून स्त्रियांसाठीं वैद्यकाच्या शाळा प्रांतोप्रांत स्थापित झाल्या आहेत आणि तसेच दवाखानेहि चालण्यांत आले आहेत.

वऱ्हाडची शाखा आहे तिच्या फंडांतून एक दवाखाना उमरावतीस चालवितात, आणि त्या शिवाय इतर प्रांतांत जाऊन वैद्यकीचा अभ्यास करणाऱ्या स्त्रियांस कांहीं मदतही देण्यांत येत असते. सन १९०१ सालीं या शाखेचें उत्पन्न ६६९६ रु. १४ आ. ९ पै झालें त्यापैकीं १५०० रुपये तीन नवीन सभासद झाले त्यांच्या वर्गणीचे आहेत. या तिन्ही गृहस्थांचा उल्लेख आह्मी कांहीं महिन्यापूर्वीं केला होता तथापि त्यांची आठवण दिल्यामुळें कदाचित् कांहीं श्रीमंतांच्या मनांत नवीन प्रेरणाही होईल. हे गृहस्थ ह्मणजे कारंज्याचे रा० रा० प्रयागजी लीलाधर व रा० रा० लक्ष्मण रामचंद्र दहिहांडेकर, आणि अंदुऱ्याचे रा० रा० खुशालराव गणपतराव देशमुख हे होत. मागील सोळा वर्षांच्या उत्पन्नाची एकुणात काढली तर सर्व उत्पन्न रुपये ११३९१९ आणे १२ पै १० आहे असें आढळेल. गेल्या वर्षीं ४५६३ रुपये १३ आणे १० पै खर्च झाला. या खर्चा पैकीं १६७४ रु० १२ आणे ७ पै सुईणींच्या पगाराकडे खर्च करण्यांत आला आणि उमरावतीच्या दवाखान्याकडे २७०० रुपये देण्यांत आले. बाकीच्या रकमा किरकोळ व जरूरीच्या आहेत. साल अखेरीला या शाखेची शिल्लक रुपये ९४६५७ आणे ३ पै ११ भरली. या शाखे कडून वऱ्हाडांत ९ सुईणी पगार देऊन ठेवण्यांत आल्या आहेत.

या लेडी डफरिन फंडाचा उपयोग नाहीं असें आह्मी ह्मणत नाहीं. परंतु सर्व वैद्यकी इंग्रजींत चालल्यामुळें विलायतचीं औषधें मागवावीं आणि त्यांचा उपयोग या डाक्टरिणींनीं करावा असा क्रम ह्या शाखेनें चालला आहे. नेटीव वैद्यक फार चांगलें आहे. या देशाला त्याचा फार उपयोग होतो आणि खर्चाच्या मानानें नेटिव औषधी फार स्वल्प मिळतात. हा प्रकार खरा आहे तरी नेटिव वैद्यक कोणीच शिकत नाहीं आणि त्यामुळें आमच्या देशाचें मोठें नुकसान होत आहे. नेटिव वैद्यकाला तिलांजली देण्यापेक्षां त्याचा यथायोग्य स्वीकार सरकार करितील तर आमच्या देशावर राज्यकर्त्यांचे मोठे उपकार होतील. अभ्यासानें विद्या चांगली राहते आणि अभ्यास सुटला तर तीच मलिन व निरुपयोगी होते. असा प्रकार आमच्या देशी वैद्यका संबंधानें होत आहे ह्मणून मोठी हळहळ वाटते.

## प्रादुर्भाव

प्लेगाला प्रारंभ आमच्या प्रांतांत अखेरीला झाला ही मोठी दुःखाची गोष्ट होय. प्लेगाचा उद्भव सध्यां पश्चिम वऱ्हाडांत असून तो फक्त रेलवेच्या बाजूबाजूला आहे. प्लेगाचें बीज बाहेरून आलें ह्मणा, किंवा नैसर्गिक बीज उत्पन्न झालें ह्मणा, कसेंही असलें तरी प्लेगाची मोठी धास्ती पडली आहे. कोणत्या दिशेनें कोणती वार्ता ऐकण्यांत येईल या संबंधानें कांहींच निश्चितपणा राहिला नाहीं. शेगांव, खामगांव, नांदुरा व मलकापूर या चार गांवीं प्लेगानें लोक मेले आणि त्यामुळें सर्वत्र मोठी चिंता पडली आहे. प्लेगाला हवामान प्रतिकूळ असें नाहीं पहाटेला थंडी पडते तो जर बंद होईल आणि उन्हाळा कडक व प्रखर होईल तर फार बरें होईल असें आतां वाटूं लागलें आहे.

प्लेगाचा आजार माणसाला जडण्या पूर्वीं प्रथमतः उंदीर प्लेगानें पटापट मरूं लागतात. हो खूण ध्यानांत धरण्यासारखी आहे. उंदीर आपोआप घरांत मरूं लागले ह्मणजे त्या घराचा त्याग तत्काळ करावा. ही सावधगिरी ठेवण्याविषयीं कोणीही चुकूं नये. प्लेगाचे फोड सर्वत्र दृष्टीस पडतात असा प्रकार हल्लीं घडत नाहीं. एक संनिपाता सारखा ताप सुरूं आहे. त्या तापानें मलकापुरास व खामगांवास एकाच घरांत तीन चार किंवा पांच सहा माणसें मृत झालीं, अशा आकस्मिक मृत्यूमुळें प्लेगाची शंका येते आणि ती शंका दृढ होण्याला प्लेगाचे फोडही क्वचित् दृष्टीस पडले. निदान या तापाचा व प्लेगाचा संबंध अगदीं निकट दिसतो.

खामगांवास व मलकापुरास एकदम कहर उसळला तेव्हां सर्वत्र एकच दाणादाण उडाली. डाक्टर रेली साहेब यांनीं तत्काळ प्रतिबंधाचे उपाय अंमलांत आणिले आणि कोणाही इसमास अधिक त्रास होऊं न देतां मोठ्या युक्तीनें प्लेगाचा बीमोड करण्यास प्रारंभ केला. अशीच व्यवस्था डाक्टर मारिसन यांनीं मलकापुरास चालूं केली. ईश्वर कृपेनें थोडीशी शांतता गेल्या दोन तीन दिवसापासून दिसत आहे खामगांवास जे २० इसम आजारी झाले त्यांपैकीं १७ मरण पावले. नांदुऱ्यास एकदोन मनुष्यें मेलीं. मलकापुरास सरासरी ९ इसम आजपर्यंत मेले हीं मरणाचीं संख्या कमी होत आहे; आणि नवीन माणसाला आजार जडत नाहीं हें दुःखांत समाधान होय. प्लेगाची दहशत पडूं नये आणि प्लेगा संबंधाच्या बंदोबस्तांत लोकांचा छळ होऊं नये ह्मणून मे. रुस्तुमजी फर्दूनजी डिपुटी कमिशनर यांनीं मलकापुरास गेल्या शनिवारीं जाहिरसभा भरविली आणि सर्व लोकांची नीटपणें समजूत घातली. मे० रुस्तुमजी साहेब यांनीं जो मार्ग दाखविला त्याप्रमाणें प्लेगाच्या संकटांत लोकांवर जुलूम होणार नाहीं व त्यांच्यावर दांडगाईचा हल्ला पडणार नाहीं अशी सर्वत्र व्यवस्था राहिली पाहिजे. आमचे सिव्हिल सर्जन या कामीं फार परिश्रम घेत आहेत त्या अर्थीं लोकांचा असंतोष होणार नाहीं असा सर्वत्र बंदोबस्त होईल अशी आह्मांस बळकट आशा आहे. ईश्वर करो आणि प्लेगाची बाधा टळो!

## सहवास सौख्य

मनुष्य प्राणी हा जात्या सहवासप्रिय आहे व त्यास एकलकोंडें राहण्याचा मनापासून तिटकारा असतो. ह्मणून तो आपले अनंत नानाविध व्यवहार व व्यवसाय करीत असतांना ज्यांच्या ज्यांच्याशीं त्याचा थोडा फार संबंध पडतो त्यांचा त्यांचा सहवास आपणांस व आपलाहि सहवास त्यांस सुखकर व्हावा ह्मणून झटत असतो. कांहीं आकस्मिक कारणानिमित्तानें जो संबंध जडतो, व जी ओळखी पडते, तो संबंध व ती ओळखी दिवसेंदिवस दृढतर होत जावी व निरंतरचा परस्परामध्यें एक स्नेहभाव व लोभ वाढवा ह्मणजे तो सहवास मोठा गोड, आनंददायी व संस्मरणीय होतो. याच्याच उलट एखाद्याचा सहवास क्षणैक कालावधींत दुःखी व कष्टी करून सोडतो. आपला सहवास दुसऱ्यास आवडावा, एकमेकांचें अंतःकरण प्रेमभरानें सद्गदित व्हावें, आणि परस्पर प्रेमळ मनोवृत्ती उचंबळून सौख्यसागरांत घटकाभर जलक्रीडा करावी असा आनंदी सुस्वभाव व हासतमुख प्रत्येकाचें असावें. निदान दुसऱ्याच्या उल्हासित वृत्तीच्या अमृतपात्रांत आपल्या कुत्सित मनोवृत्तींचा विषबिंदु टाकून सर्व सौख्याची माती होऊं न देण्याविषयीं प्रत्येकानें खबरदारी घेतली पाहिजे. सहवास सौख्याचें खरें रहस्य प्रत्येकासच मिळतें असें नाहीं तरी आपण सदासर्वदा आनंदी राहून इतरास आनंदविणें आपलें कर्तव्य आहे. सुखदुःखें हीं स्पर्शजन्य रोगा प्रमाणें अन्योन्यहत वाढत जातात. आपली किरकिर दुसऱ्याचें मन दुखवतें तसेंच आपलें प्रेम दुसऱ्याचें ओढून घेतें असा अनुभव आहे. आपण दुसऱ्याशीं जसें वागूं तसेंच आपणाशीं दुसरे वागतात. एकदां परस्परांचीं मनें मिळालीं ह्मणजे तीं जास्त जास्त जुळत जातात तसेंच तीं फाटूं लागलीं तर फाटतच जातात. आपण दुसऱ्याचा मान केला तर ते आपला करितील तोच त्यांचा आपण अपमान केला वा उण्या उत्तरानें आपण त्यांचें मन दुखविलें तर तेहि आपली प्रसंगविशेषीं मानखंडणा करितील यांत संशय नाहीं. करावें आणि करून घ्यावें ही साधी पण अर्थचतुर ह्मण ध्यानांत धरून प्रत्येकानें आपला सहवास दुसऱ्यास सुख देईल निदान दुःख तरी देणार नाहीं अशाबद्दल पदोपदीं जपावें, कारण असे प्रसंग दररोज शेंपन्नास येतात हें विसरूं नये.

आपला सहवास कोणाबरोबर कसा घडेल याचा बिलकुल नेम नाहीं. व्यावृत्ती व व्यापार अनेक आहेत व हेच सहवासाचे प्रसंग होत. ज्याचा सहवास दृढ त्यापासून सुखाची व दुःखाची व्युत्पत्ती अधिक होय. पतीपत्नी, मातापिता, बंधुभगिनी, पितापुत्र, आप्तमित्र आदिकरून जे संबंध होत हे सर्व साधारण सहवासाच्या सुखदुःखाचीं कारणें होत. तसेंच सेव्यसेवकभाव, शेजारधर्म, राजा व प्रजा यांचा संबंध ह्या विशेष प्रकारच्या सहवासवृत्ती होत. कांहीं तरी प्रसंगानें दोन गोष्टींचा एकत्र वास घडून त्यापासून सुखाचें प्रेम व दुःखाचा तिटकारा उत्पन्न होतो. हा प्रकार आपला निर्जीव वस्तूंशीं सहवास झाला असतांहि दृष्टीस पडतो. एखाद्या स्थळाची वा वस्तूची नुसती आठवण झाली तरी मनास मोठा आनंद वाटतो व ती वस्तू प्रत्यक्ष पाहिली तर मनास आनंदानें भरतेंच येतें. तसेंच एखाद्या गोष्टीच्या स्मरणानें जी किळस व ओकारी येते तिचाहि प्रसंगोपात अतिरेक होतो. ह्या गोष्टीच मोठ-

मोठे ज्ञानीजन देवापाशीं आह्मांस सत्समागम दे ह्मणून अनन्यभावें हेंच मागणें मागत असतात. व तो मिळणें ह्मणजे खरोखरीच मोठा लाभ होय.

## पादसेवनम्

आह्मांस इंग्रज प्रभूंनीं जिंकिलें तेव्हांच पादसेवन करण्याच्या हुद्दयावर आमची योजना झाली, पण हें पादसेवन ह्मणजे प्रत्येक राजाधिकारी युरोपियनाचे चर्मपाद चुरणें हा खरोखरीच गर्भितसुद्धां अर्थ नियत नाहीं. प्रजेनें राजनिष्ठपणानें रहावें व राजानें प्रजावात्सल्यानें प्रजेचा प्रतिपाल करावा इतकाच सेव्यसेवकभाव आह्मांकडे आला आहे. हा सेवाधर्म ह्मणजे गुलामगिरी नव्हे हेंच आह्मांस पुनःपुनः सुचविणें आहे. लोकांनीं ही गुलामा प्रमाणें नीच पदसेवा प्राण गेला तरी करूं नये व तशी सेवा अधिकारवर्गानें सूज्ञपणानें कोणाची घेऊंहि नये. पण कित्येक असमंजस युरोपियन लोक नेटिवास जित ह्मणजे केवळ गुलाम समजतात व त्याच प्रमाणें त्यास वागवितात. अशाच प्रकारची एक गोष्ट आमच्या वाचण्यांत आली आहे ती आह्मी मुद्दाम सर्वांच्या माहितीसाठीं व आपलें काय कर्तव्य आहे हें समजण्यासाठीं देत आहों.

आमचे रेसिडेंट साहेब कर्नल बार ह्यांनीं सामाजिक प्रेम ह्यावर एक सुरेख लेख लिहिला आहे व त्यांत त्यांनीं इंग्रिश व नेटिव लोकांचा सहवास व संघटन वाढत जाण्याच्या कामांत काय काय अडचणी आहेत यांचें चांगलें प्रतिपादन केलें आहे. त्यांनीं आपल्या लेखांत एका नेटिव राजाचा व इंग्रज गृहस्थाचा आगगाडींत कसा गमतीचा प्रसंग आला हें सांगितलें आहे. ते ह्मणतात कीं:—

एक राजा आपल्या राजधानीच्या स्टेशनवर उतरला, त्यावेळीं त्यांस पुष्कळसे लोक सामोरे भेटण्यास आले होते. तो पहिल्या क्लासच्या डब्यातून न उतरतां दुसऱ्या क्लासमधून उतरतांना पाहून लोकांस जरासें चमत्कारिक वाटलें, हें पाहून तो ह्मणाला कीं, काल रात्रीं मला जरासा पहिल्या वर्गाच्या डब्यांत त्रास झाला ह्मणून असें मीं केलें. ज्या डब्यांत मी बसलों होतों त्याच डब्यांत एक युरोपियन शिकारीनें थकून भागून येऊन बसला. व मी कोण व काय हें समजून न घेतां आपल्या पायाची चप्पी करण्यास त्यानें मला सांगितलें व मी राजा आहे असें सांगितलें असतें तरी त्यानें तें माझें बोलणें जुमानलें नसतें.

अशा प्रकारची माणुसकीस न शोभणारी व असभ्य वर्तनाची गोष्ट प्रत्यक्ष कर्नल साहेबच लिहितात त्या अर्थीं ती खरीच असली पाहिजे. नेटिवांस तृणवत लेखणाऱ्या युरोपियनांच्या गोष्टी पुष्कळ ऐकिवांत आहेत. नेटिव ह्मणजे निर्जीव वस्तू होय व ती डोळ्या समोर असल्या [illegible] हिणीचीहि अश्लाघ्य गोष्ट करण्यास त्या [illegible] कळ वेळां दिक्कत व कंतही वाटत नसते, ता त्यांच्या उद्दाम व उद्धटपणाच्या व अडाण्या वागणुकीनें लोकांच्या मनांत असंतोष [illegible] होऊन त्यांचीं मनें कलुषित करून सोडतात.

अशा प्रकारें कोणी कोणाचा तिरस्कार करूं नये, एकमेकांचा मान सन्मान राखावा व उत्तरोत्तर परस्परांचा लोभ वृद्धिंगत होऊन प्रेमभाव वाढेल असें वर्तन ठेवावें. ह्मणजे अर्थातच एकमेकांचा सहवास एकमेकांस आवडेल. सध्यां जेता व जित असा जो हृदयभेदक व कर्णकटु संबंध जाणवला जातो तो नाहींसा होईल आणि एकास कांटा बोचला कीं, लागलीच दुसऱ्याचे डोळ्यास पाणी येईल इतका एकजीव होऊन जाईल.

## The Berar Samachar

MONDAY MARCH
3 1902

'Poverty of India' was the recent topic of an interesting discussion in the Imperial Parliament. It has attracted the attention of the Secretary of State and there are important declarations on the part of the Government. Truth lies somewhere between the opposing opinions that have been expressed in this connection. India is very poor. This fact is admitted in a plain and out-spoken manner by Lord George Hamilton. There is the further admission of a great principle. The Englishman's claim to rule India lies in the fact of improving the material prosperity of its people. If there be a flaw in this result the British people will have ruled over India for no useful purpose. With this noble principle as our guiding angel, we shall see that the poverty of India exists with the development of material prosperity. Both the facts co-exist in a strange manner. India is explorted and developed for the benefit of the ruling people whereas in this work of augumenting the material resources of India there is a vast drain of wealth from this country to pay off the cost of the foreign rule and to make up a great margin of profit which is due to the foreign capital that is invested in India. This is then the explanation as to how material development has brought home to the Indian people the growing miseries of an extensive poverty. Lord George Hamilton alludes to free and ample supply of food—stuffs that was available in the worst of famines and points out that the famine was really a wage—famine. With the failure of crops the people were therein off their usual employment and had to starve themselves for want of work. We do not agree with the rosy picture that Lord Hamilton has attempted to draw. His comparison of India with London fails where there is no connection of accumulated wealth in India corresponding to that in London. The squalid poverty prevails as much in England as it does in India. The following quotations will point out the programme the Government have in view in remedying the grievances of poverty. We do not think that such a scheme will be of any use unless it is coupled with some benevolent measures on the executive side also.

"Recently a law has been passed with reference to the Punjab, whereby the power of alienation has been greatly restricted and a power has been given to the Courts in certain cases to review and look into contracts under certain conditions. A Bill of almost the same character was passed for the Bombay Presidency recently and it is proposed to introduce legislation of a similar character in certain other parts of India. Now I come to the difficulty of proposing or carrying through legislation of this character. We have created in India under our system a great interest in the money—lenders. We have educated and turn out a number of University men every year with no means of livelihood unless they become lawyers or newspaper writers, or attach themselves to the money-lending crowd; and although these gentlemen and the papers they represent are always attacking the Government as regards the poverty of India, the moment we attempt to curtail the powers of the money—lenders they turn round and do their very best to prevent such legislation passing into law.

The hon. gentleman Mr. Caine estimated in English pence the average income which the peasant or labourer in India enjoys. I do not myself attach very much importance to these hypothetical calculations of what is the average income of any body in a great continent like India, as they are largely based on supposition. I declined to produce certain documents because they are old history, and I doubt whether they would do much to elucidate some of the problems which the hon. gentleman raised; but figures do show very clearly that, although the movement has been slow, it has of recent years been upwards, and on the whole, the average income in India has increased, but very slowly. The hon. gentleman asked what can a man do on only $1\frac{1}{2}$d. a day? Food in India is extraordinarily cheap, and during the worst famines and during the recent famine relief in the Central Provinces a man doing a good day's work could be kept in good condition on a penny a day when the price of food was at its normal rate. I was looking through some papers the other day, which were prepared in Lord Dufferin's time and I came across a statement, which I believe to be absolutely true, as to what a man can do on an income of six rupees a month. That is 96 pence, and it gives a man a little more than 3d. a day. Any one in receipt of this 3d. a day and being the head of a family consisting of not more than four, could give his family every day three meals of rice and millet, and fish and butcher's meat once or twice a week; but there would be no milk or cheese for the children."

### वऱ्हाड

रा. रा. काशीनाथ श्रीराम जठार असि० कमिशनर हे हैदराबादेस बदलल्यामुळें तूर्त इलिचपुरास मि० अजिमोद्दीन तहशिलदार जळगांव यांस ए० असि० कमिशनर नेमण्यांत आलें.

आणि जळगांवच्या तहशिलदारीवर मि० आरदेसर दिनसाजी चिनाय यांचे चिरंजीव यांस नवे तहशिलदार नेमण्यांत आलें.

### NOTICE

Notice is hereby given that draft rules framed by the Khamgaon Municipality for the imposition of a tax under Section 41 (1) A (b) of the Berar Municipal Law 1886 on professions and trades practised in this Municipality in lieu of the present taxes on vehicles and animals and buildings and lands are published for general information.

The class of persons proposed to be taxed, the rate and system of assessment proposed to be adopted will appear from the following rule.

1. The tax shall, subject to the following provisos, be assessable on every person who practises any profession or art or any trade in the Khamgaon Municipality, the whole or any part of whose income derived from any source other than agriculture is not less than Rs. 100 per annum at the rate of one and a quarter per cent on the taxable portion of his estimated income derived from any such source, provided that.

I. No person or firm shall be assessed at a sum exceeding Rs. 500 per annum or less than eight annas.

II. Rs. 99 the maximum non taxable income shall be dadncted from the full annual income of each assessee and the tax shall be calculated on the remainder.

III. All payments made on account of pensions or Provident Funds or in the case of persons who effect life insurances, the amount payable as premium (when such payments or amounts do not exceed one sixth of the full annual income) shall also be deducted from the full annual income and the tax be calculated on the remainder.

IV. In calculating the assessment of the tax all fractions of eight annas shall be reckoned as eight annas.

Any inhabitant within the Khamgaon Municipal limits objecting to the proposed imposition of tax shall within 30 days from the publication of this notice submit his objections in writing to the Committee.

(Signed) F. L. Crawford
15/2/1902 Chairman
Khamgaon Municipality

## वर्तमानसार

विलक्षण माहिती— कलकत्याचे ब्राह्मण कांदा किंवा कोंबडें खात नाहींत. पण मांस मासळी मटकावतात. बकऱ्या मेंढ्यानें कलकत्तेकर ब्राह्मणांचें ब्राह्मणत्व बिलकूल जात नाहीं, कांद्यानें मात्र साफ जातें. सौभाग्यवती बायका हातांत लोखंडाच्या बांगड्या घालतात, मात्र इतकेंच कीं, वर सोन्याचा पत्रा असतो. सौभाग्यवती बाया शेंदूर लावतात पण तो कपाळावर नसतो भांगाचे खालीं असतो. हा शेंदुराचा टिळक वैधव्यानें जातो. मणीमंगळसूत्र तिकडील बायकांना मुळीं माहीत नाहीं. ब्राह्मणेतर तर राहूं द्या, ब्राह्मणाच्या बायाहि विटाळशा बाहेर बसत नाहींत. नेहमीं प्रमाणें घरांत वापरतात.

सूचना— आपले बादशहा सातवे एडवर्ड यांना, राज्याभिषेकाचे वेळीं सर्व पत्रकर्त्यांनीं मिळून मानपत्र द्यावें. सूचना योग्य आहे, याचा सर्व पत्रकर्त्यांनीं विचार करावा.

आ. रा. ब. अच्युतराव बापू साहेब देसाई यांनां सांगलीस अडमिनीस्ट्रेटर नेमिलें आहे. यांच्या कारकीर्दींत त्या संस्थानची चांगली भरभराट होवो!

दुर्दैव— सांगलीकर श्री० तात्यासाहेब स्वर्गवासी होऊन पुरे दोन महिनेही लोटले नाहींत तोंच यांचे पोटच्या पोरासारखे पाळलेले हत्ती घोडे विक्रीस निघाले!

जपान व इंग्लंड यांमध्यें एक तह झाला असून दोन्ही राष्ट्रांनीं चीन व कोरिया हीं राज्यें अगदीं अविच्छिन्न राखावीं व एका पेक्षा अधिक परकीय राष्ट्रांशीं लढाईचा प्रसंग आल्यास एकमेकांस मदत करावी असें ठरलें आहे.

---

नोटीस

सखाराम वल्लद यादवजी गहुकार धनोजी कुणबी राहणार चिकणी प्रगणे हिंगणघाट तालुका वरूडा जिल्हा चांदा.

यांसः—

नोटीस देणार गंगू मर्द सखाराम गहुकार राहणार त्रासरी प्रगणे व तालुके केळापूर जिल्हा वणी इजकडून नोटीस देण्यांत येते कीं मी तुमची लग्नाची बायको असून आज ७ वर्षे झालीं तुह्मी मला आपलें घरीं नेऊन नांदवीत नाहीं अगर मला कोणते प्रकारें खर्चेही देत नाहीं. मला ऋतु प्राप्त झाल्यास आज ६ वर्षें झालीं. मी एक वेळ ऋतु प्राप्त झाल्या नंतर माझे मामास घेऊन तुमचें घरीं आलें होतें त्यावेळेस मला तुह्मी ८ दिवस घरीं ठवून नंतर मला मारहाण करून घराचे बाहेर काढून दिले. त्यावेळेस तुमचे गांवचे पाटलांनीं माझे बरोबर १ गोंडीण बाई देऊन मला माझ मामाचें घरीं आणून घातले त्या गोष्टीस सुमारें ४ वर्षें झालीं त्या दिवसापासून पुन्हां तुह्मी मला घेऊन गेला नाहीं तरी आज पावेतो तुमची वाट पाहात मी मामाचे शेजारी राहून मजुर्यानें होईल ती मजुरी व कांहीं सावकार लोकांचें कर्ज घेऊन उदरनिर्वाह केला. ते मजकडेस लोकांचें देणें रुपये आज पावेतो २०० दोनशें रुपये झाले आहेत ते रुपये आदा करण्याचें साधन माझे जवळ कांहीं नसल्यामुळें मला हल्लीं कोणी पैसा देऊ शकत नाहीं. सबब माझा उदरनिर्वाह होण्याची पंचाईत पडली आहे ह्मणून आपणास या नोटिशीनें कळविले आहे तरी आपणास ही नोटीस पावल्यापासून ८ दिवसांचे आंत माझे गांवीं येऊन मजकडेस झालेल्या कर्जाची आदाई ज्याची त्यास करून मला घेऊन जावें मी तुमचे घरीं येण्यास कबूल आहे. जर करितां वरील मुदती प्रमाणें तुह्मी मला लोकांचें देणें देऊन घेऊन न गेल्यास मुदत संपल्याबरोबर तुमची वाट न पाहतां जनरीती प्रमाणें दुसरा गंधर्व विवाह करून घेऊन आपली व्यवस्था करून घेईन मग पुढें तुमची कोणते प्रकारची तकरार ऐकणार नाहीं व मजवर तुमचा लग्न संबंधीं कांहींच अधिकार राहणार नाहीं या करितां आपणांस जी गोष्ट पसंत वाटेल तसें करावें कळावें तारीख २६।२ १९०२ इसवी.

दस्तुर—देवीदास नारायण काशीकर राहणार घाटंजी.

सहीची बांगडी गंगू मर्द सखाराम इचे हातची असे.

---

नोटीस

रा. रा. देवलाल कल्याणचंद आगरवाले दुकान हिवरखेड तालुक आकोट जिल्हे आकोले हल्लीं मुक्काम नागपूर पेठ शुक्रवार यांसः—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं आह्मी तुह्मास १९९८ सालांत ९३३ नंबरचे शेत एकर २ गुंठे ९ आकार ९ रुपयाचे आह्मी तुह्माला कचे नांवें करून दिलें होतें त्याचा करार शेकडा १ रुपया प्रमाणें व्याजा सुद्धां रुपये देऊन शेत वापस आमचे आह्मी नांवें करून द्यावें. परंतु तुमचे मनांत आतां बेइमानकी उभी राहिली. तुह्मी ह्मणतां आह्मी खरेच खरिदी करून घेतले. तरी तुह्मी आठ दिवसांचे आंत हिशोब करून तुमचे सालीम पैसे घेऊन जावें नाहीं तर याचे पुढें आह्मी व्याज वगैरे कांहींच देणार नाहीं व आह्मी कोर्टांत फिर्याद करू. व त्या फिर्यादीचा खर्च वगैरे तुमचेवर बसेल कळावें तारीख १२।२।१९०२ इ.

सही

बालाराम वल्लद एकोबा देशमुख राहणार हिवरखेड.

---

नोटिशीचें उत्तर

बेशमी झांबरी मर्द लक्ष्मण कुदांडे हल्लीं मुक्काम टाकळी बिंद्राबन तालुके केळापूर जिल्हे वणी इला खालीं सही करणार याजकडून उत्तर देण्यांत येतें कीं तूं तारीख ३।२।१९०२ इसवी रोजीं नोटीस वऱ्हाड समाचारांतून दिली ती खोटी आहे. कारण तुला ऋतु प्राप्त झाले पासून दोन वर्षांत मी नवरुढी सारखा तुझेंशीं संसार करीत नाहीं. अशी ही तुझी पहिलीच तकरार आहे. सबब हा फंद असावा असें दिसतें तरी रितिप्रमाणें मी तुझेसी संसार करित नाहीं असें सिद्ध करून दिल्या शिवाय मी तुला सोडचिठ्ठी देत नाहीं. व तुला दुसरा नवरा करण्यास कोणताच अधिकार नाहीं. तसेच तूं माझें येथून गेलीस त्या वेळेस बरोबर २१० दोनशें दाहा रुपये नगदी कलदार व आंगावरील दागिनें किंमत ७५ पाऊणशें अंदाजचे नेले आहेस. त्यांत कांहीं अफरातफरी झाल्यास त्याचाही जबाब तुला द्यावा लागेल. तरी वरील सर्व गोष्टींचा विचार करून तू तावडतोब मजकडे निघून ये ह्मणजे आपण पूर्वीं प्रमाणें संसार करूं. कळावें तारीख २१।२।०२ इसवी०

दस्तुर— केशव बापूजी चवधरी राळेगांव.

सहीची निशाणी लक्ष्मण वल्लद गुनाजी कुदांडे राहणार सराटी याची असे.

---

जाहिरात

खालीं सही करणार याज कडून जाहिरात देण्यांत येते कीं छावणी परतवाडा येथील ट्रेडिंग कंपनीचें दुकान बंद होऊन बहुतेक भागिदारांचे पैसे ज्याचे त्यास परत दिले आहेत. परंतु कांहीं भागीदार मयत झाले आहेत. व कांहीं भागीदारांचा पत्ता लागत नाहीं सबब जाहीर करण्यांत येतें कीं ज्या भागीदारांचा पैसा मिळाला नसेल त्यांनीं आमचेकडे सुवाच्य पत्तासह नांव कळवावें ह्मणजे त्यांचे हिशाब पैसे हिस्सेरसि प्रमाणें जे आले आहेत ते त्यांजकडेस पाठविण्यांत येतील. कळावें तारीख २४ माहे फेब्रुवारी सन १९०२ इ०

सही

गणेश नागेश वकील लिक्विडेटर.

---

## मुंबई बॅंकची ठेव ठवण्याचा बॅंक

या सेव्हिंग बॅंक मध्यें खालील अटीव ठेव ठेविली जाईल.

कोणत्याही एका वर्षात ह्मणजे जानेवारीच्या १ ले तारखे पासून तों दिसेंबरच्या ३१ तारखे पर्यंत फक्त एक हजारा पर्यंत रुपये ठेविले जातील.

दोन अथवा अधिक मनुष्यांच्या नावानें देखिल एक ठेव ठेवितां येईल. व त्यांच्या हयातींत, तसेंच त्यांचे मागें त्यांच्या पैकीं एकास अथवा अधिक जणांस ठेव काढतां येईल.

एका वर्षात एक हजार रुपया पर्यंत ठेवलेल्या रकमेवर दरसाल दर शेकडा ३ तीन रुपये व्याज दिलें जाईल. मात्र ५००० पाच हजारा वरील रकमेस व्याज नाहीं.

मुंबई ब्यांक आकोला १९ जुलै १८९८ } A. G. Watson Agent.

---

## खरेद करा !

## रास्कोपची थेट व खरीं पेटंट वाचस

## नकली मालास भुलून पैसे खर्चू नका!!!

रेल्वेच्या व इतर अवजड कामास हेंच वॉच अत्यंत उपयुक्त आहे. हें वॉच पहिल्या प्रतीचें बिनचूक वेळ दाखविणारें असून इतर वॉचेस प्रमाणें यांस नेहमीं रिपेरची जरूर नसून या बद्दल विशेष काळजी व लक्ष पुरविण्याची अवश्यकता नाहीं. ह्मणून जंगलांत बाहेर फिरणारे लोकांचें तर हें सोबतीच आहे असें अनुभवास आलें आहे. याजकरितां ज्याला आपली वेळ बरोबर राखण्याची जरूरी आहे अशा लोकांस ह्मणजे इंजिनियर, कॉन्ट्रॅक्टर, ओव्हरसियर, फारेस्ट कान्सरव्हेटर व इतर प्रवासी लोकांस हें वॉच घेणें विषयीं आह्मी खात्रीपूर्वक शिफारस करितों. आमची **रास्कोपच्या पटंट वॉचेस** संबंधीं याहून जास्त लिहिण्याची जरूरी नाहीं कारण त्याच्या गुणांची प्रचीती तींच आपोआप दाखवितात, इतकें लिहिलें असतां बस्स आहे. हीं घड्याळें आपली स्वतःच शिफारस आजपर्यंत करीत आलीं आहेत, करीत आहेत व पुढेंही अशीच करीत राहतील. प्रत्येक वॉच फार काळजीपूर्वक तपासून चालवून तें वेळ बरोबर दाखविते अशाबद्दल ग्यारंटी देण्यांत येतें, व त्याबद्दलची जोखीमदारी आमचे शिरावर आहे.

**सूचनाः**—पुढील नमुना २१ लाईनचें मोठ्या आकाराच्या वॉचचा आहे.



मोठ, मध्यम १६ रु. १७ रु. लहान.

### राल्ड गोल्ड ४ वर्षांच्या ग्यारंटीचें

१९ लाईन ओपनफेस....................४०
१९ ,, हंटिंग....................५०

### गोल्ड ५ वर्षांच्या ग्यारंटीचें.

१८ लाईन ओपन फेस फिरत्या झांकणाचे ........१५०
१९ ,, हंटिंग, नकशीचे ...........२५०

### मेटलचें तीन वर्ष ग्यारंटीचें.

रास्कॉप पेटंट २१ लाईन एकस्ट्रा स्ट्रांग १८
१९ ,, सेकंद कांट्यासह...........२०
१९ ,, मध्यभागी सेकंद काटा असलेलें ................२२
१९ ,, हाफ हंटिंगचें................२०
१९ ,, हंटिंगचें ....................२०
१४ ,, रिस्ट वॉच ....................२०

### इन्यामल टेल ३ वर्षांच्या ग्यारंटीचें

१९ लाईन ओपन फेस............२०
१९ ,, हंटिंग......................२०
१४ ,, रिस्टवॉच....................२०

### सिल्व्हर वाच ४ वर्षांच्या ग्यारंटीचे

१४ लाईन रिस्ट वॉच ...........३०
१४ ,, हंटिंग........................३५
१८ व १९ ,, ओपनफेस...........३०
१९ ,, सेकंद कांट्यासह ............३२
१९ ,, मध्यभागीं सेकंद कांटा असलेलें ................३५
१९ ,, ओपनफेस सुंदर नकशीचें....३५
१९ ,, हंटिंग ..................... ४५

लेडीज वॉचीस १४, १८, क्यारेट गोल्ड रुपये ६५–२०० पर्यंत.

**सी. हीनीगर आणि कंपनी,**
ओरिजिनल निनीयन रास्कोप पटंट वॉचेसचे सोल एजंट.
[illegible] मुंबई.

---

☞ हे पत्र आकोल[illegible] खंडेराव बाळाजी फड[illegible] ह्मणून [illegible] कैलासवासी [illegible] "वऱ्हाड-समाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यानीं छापून प्रसिद्ध केलें.

REGISTERED N. No. 4

वर्षाची आगाऊ ६ हाशील ०१२
सहामाही ,, ३ ,, ०८
साल अखेर ,, ७ ,, १ ०८
किरकोळ अंकास ........................०४

नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस............०१ ०६
दुसरे खेपेस ............०१

Annual in arrears ...
Six monthly......... 3 ............... 8 as
Single copy ............................ 4 as

Advertisement
Below 10 lines ...... 2 Rs
Per line over 10 ...... 4 as
Repetition Per line... 3 as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOL XXXVI AKOLA MONDAY 10 MARCH 1902 NO 10

वर्ष ३६ आकोला सोमवार तारीख १० माहे मार्च सन १९०२ इ० अंक १०



### मुंबई बॅंकची ठेव ठेवण्याची

### बॅंक

या सेव्हिंग बॅंक मध्यें खालील अटीवर ठेव ठेविली जाईल.

कोणत्याही एका वर्षांत ह्मणजे जानेवारी च्या १ ले तारखे पासून तों दिसेंबरच्या ३१ तारखे पर्यंत फक्त एक हजारा पर्यंत रुपये ठेविले जातील.

दोन अथवा अधिक मनुष्यांच्या नांवान देखील एक ठेव ठेवितां येईल. व त्यांच्या हयातींत, तसेंच त्यांचे मागें त्यांच्या पैकीं एकास अथवा अधिक जणांस ठेव काढतां येईल.

एका वर्षांत एक हजार रुपया पर्यंत ठेव लेल्या रकमेवर दरसाल दर शेकडां ३ तीन रुपये व्याज दिलें जाईल. मात्र ५००० पाच हजारा वरील रकमेस व्याज नाहीं.

मुंबई ब्यांक आकोला १९ जुलै १८९८ } A. G. Watson Agent.

### खरेद करा !

### रास्कोपची थेट व खरीं पेटेंट वाचेस

### नकली मालास भुलून पैसे खर्चू नका !!!

रेल्वेच्या व इतर अवजड कामास हेंच वॉच अत्यंत उपयुक्त आहे. हें वॉच पहिल्या प्रतीचें बिनचूक वेळ दाखविणारें असून इतर वॉचेस प्रमाणें यांस नेहमीं रिपेरची जरूर नसून या बद्दल विशेष काळजी व लक्ष पुरविण्याची अवश्यकता नाहीं. ह्मणून जंगलांत बाहेर फिरणारे लोकांचें तर हें सोबतीच आहे असें अनुभवास आलें आहे. याजकरितां ज्याला आपली वेळ बरोबर राखण्याची जरूरी आहे अशा लोकास ह्मणजे इंजिनियर, कॉंट्र्याक्टर, ओव्हरसियर, फारेस्ट कान्सरव्हेटर व इतर प्रवासी लोकांस हें वॉच घेणें विषयीं आह्मी खात्रीपूर्वक शिफारस करितों. आमची रास्कोपच्या पेटंट वॉचेस संबंधीं याहून जास्त लिहिण्याची जरूरी नाहीं कारण त्याच्या गुणांची प्रचीति तीच आपोआप दाखवितात, इतकें लिहिलें असतां बस्स आहे. हीं घड्याळें आपली स्वतःच शिफारस आजपर्यंत करीत rice st for ... आहेत, करीत आहेत व पुढेंही -and the ... राहतील. प्रत्येक वॉच फ ...ered a dete ...as in a rup... कि तपासून चालवून तें वेळ ...ve realized ... अशाबद्दल ग्यारंटी देण्यांत येते, व त्याबद्दलची जोखीमदारी आमचे शिरावर आहे.

सूचनाः—पुढील नमुना २१ लाईनचें मोठ्या आकाराच्या वॉचचा आहे.



मोठ, मध्यम १६ रु. १७ रु. लहान.

#### रोल्ड गोल्ड ४ वर्षांच्या ग्यारंटीचें

१९ लाईन ओपनफेस......................४०
१९ ,, हंटिग..............................५०

#### गोल्ड ५ वर्षांच्या ग्यारंटीचें.

१८ लाईन ओपन फेस फिरत्या झांकणाचे ........१५०
१९ ,, हंटिग, नकशीचे ............२५०

#### मेटलचें तीन वर्षें ग्यारंटीचें.

रास्कॉप पेटंट २१ लाईन एकस्ट्रा स्ट्रांग १८
१९ ,, सेकंद कांट्यासह............२०
१९ ,, मध्यभागी सेकंद कांटा असलेलें ................२२
१९ ,, हाफ हंटिंगचें..................२०
१९ ,, हंटिंगचें ......................२०
१४ ,, रिस्ट वॉच ....................२०

#### इनॅमल्ड मेटल ३ वर्षांच्या ग्यारंटीचें

१९ लाईन ओंपनफेस............२०
१९ ,, हंटिग..........................२०
१४ ,, रिस्टवॉच......................२०

#### सिल्व्हर वाच ४ वर्षांच्या ग्यारंटीचें

१४ लाईन रिस्ट वॉच ............३०
१४ ,, हंटिंग............................३५
१८ व १९ ,, ओपनफेस............३०
१९ ,, सेकंद कांट्यासह ............३२
१९ ,, मध्यभागीं सेकंद कांटा असलेलें ..................३५
१९ ,, ओंपनफेस सुंदर नकशीचें....३५
१९ ,, हंटिंग ...................... ४९

लेडीज वॉचीस १४, १८, क्यारेट गोल्ड रुपये ६५–२०० पर्यंत.

सी. हीनीगर आणि कंपनी,
ओरिजिनल निनीयन रास्कोप पेटंट वॉचेसचे सोल एजंट,
५ हार्नबी रोड, मुंबई,


### योग्य गौरव.

मे० अझीमोद्दीन तहाशिलदार साहेब यांची बदली एलिचपूर येथें झाल्यामुळें त्यास काल रोजी सायंकाळीं रा. सा. त्रिंबकराव विश्वनाथ गाडम कंपनीचे एजंट यांचे घरीं पानसुपारी व चहा पार्टी झाली. मे. तहशिलदार साहेब हे फार मनमिळाऊ व दयाळू आहेत त्यांचे आगमनानें सर्वांस मोठा आनंद झाला होता. परंतु लवकरच बदली झाली यामुळें सर्वांस खेद झाला, परंतु ते बढतीचे जागीं जात असल्यामुळें मोठा आनंद वाटत आहे. पानसुपारीस बरीच मंडळी ह्मणजे मे. ना. तहशिलदार साहेब डाक्टर साहेब, दरोगा साहेब, चीफ साहेब, मे० हजत अली साहेब, मे० श्री० मोहनचंद नानाभाई सेट साहेब, मे० बापू गदाधर डोडोळकर, मे० हीरजी खेतसीचे एजंट मि. लधा परवत साहेब रा. रा. केशवराव म्यानेजर मो० गो० कंपनी व नेटिव्ह जीन कंपनीचे म्यानेजर मि. पुराणीक व मि. आबासाहेब काणे वगैरे मंडळी व प्रसिद्ध हिंगोलीकर नाटक मंडळी हजर होती. गाणें वगैरे सुबक होऊन पानसुपारी अत्तर गुलाब होऊन शेवटीं सर्वांचे आभार मानून पार्टी विसर्जन झाली. कळावें तारीख ५।३।०१

आपला
जळगांवस्थ

### भारत भाग्योदय अथवा सोन्याचा दिवस

नंबर १०

काळ्याकुट्ट रात्रीं गुपचीपरीतीनें बिलकूल हालचाल न करितां पुण्यावर छापा घालण्यासाठीं जाण्याचा सर्वांचा संकेत होता. या प्रमाणें त्या मावळे लोकांची टोळी आपलीं हत्यारेंपात्यारें नीट पाजळून चालली होती. शिवाजी, तानोजी, जासोजी हे निवडक २५ मावळे लोकासमवेत पुढें चालत होते. चालतां चालतां ते पुण्या नजीकच्या आंबराईत येऊन उतरले. जिकडे तिकडे निबिड अंधःकार असल्यामुळें डोळ्यांत बोट घातलें तरी देखील दिसण्याची पंचाईत होती. झाडांचीं पानें मात्र एखाद्या वाऱ्याच्या झुळके सरसी सळसळ आवाज करीत होती. रस्त्यांतून जाणारे येणारे वाटसरूंना या लोकांची हालचाल कांहीं एक दिसत नव्हती. होतां होतां मध्य रात्रीचा सुमार झाला. गजबजलेलें पुणें शहर अगदीं निद्रिस्त झालें. रखवालदाराच्या "आलबेलो" शिवाय आणि "हुशार रहो" या आवाजा शिवाय कांहींच ऐकूं येत नव्हतें. इतकी सामसूम असतांना एकाएकी "ढम् ढम्" आवाज ऐकूं आला व मशालींचा उजेड व बऱ्याच लोकांचा समुदाय शिवाजी व इतर लोक यांच्या दृष्टीस पडला. पुणें शहर तटबंदी नसल्यामुळें अशा प्रकारच्या गोष्टी बाहेर दिसण्यास कांहीं अवघड नव्हतें. आतां मात्र खास संधी आलेली आहे, आतां वेळ घालविण्यांत अर्थ नाहीं असें शिवाजीस वाटलें. त्याच्या अंगावर रोमांच उभे राहिले. त्यानें आपल्या तानोजी– जासोजी– जिवलग स्नेहांची नेत्रांतून अश्रु वाहत आहेत अशा स्थितींत कडकडून भेट घेतली. "प्रिय मित्रांनो" कदाचित् ही शेवटचीच भेट होणार नाहीं ह्मणून कशा वरून असेंही शिवरायानें ह्मटलें. हळूं हळूं गुपचिप रीतीनें शिवाजी आपल्या निवडक लोकांनिशीं त्या समारंभात जाऊन मिळाले.

असा हा लोकांचा समुदाय वाजत गाजत चालतां चालतां पाहिस्तेखान सरदाराचे घरही आलें. जसजसा हा थवा त्या घराजवळ आला या प्रमाणें पाहिस्तेखानाच्या गोषांतील सुकुमार बायका, लोकांच्या दृष्टीस आपला "गोषेपणा" न पडेल अशा रीतीनें खिडक्यांचीं दारें किलकिली उघडून पाहूं लागल्या. व कांहीं वेळानें त्यांनीं आपल्या खिडक्या पूर्ववत बंद करून घेतल्या. अशा गडबडींत या समारंभापैकीं सुमारें ३० लोक या पाहिस्तेखान सरदाराच्या घरापाशीं गुपचीप रीतीनें दबा धरून बसले. पाहिस्तेखानाच्या बंगल्याच्या स्वयंपाक घराला एक मोठीशी खिडकी होती. व यांतून बाहेरची हालचाल सर्व दिसण्यासारखी होती. परंतु घरांतील चाकर माणसें व वृद्ध तरुण बायका मृत्यु लोकच्या अमृत! पानानें दंग होऊन गेल्यामुळें त्यांचें इकडे लक्ष जाईल कशाला? हळूं हळूं या खिडकीची एक वीट पडली, नंतर दुसरी, नंतर तिसरी, नंतर चवथी, असें होतां होतां कांहीं वेळानें त्या खिडकीच्या खालच्या विटांची अर्धी भिंत पार पडली. व "कडकड" आवाज झाल्या बरोबर घरांतील कांहीं मंडळी दचकून जागी झाली. आणि अर्ध बोबड्या आवाजानें "दगा दगा" ह्मणून ओरडली. व पाहातात तों या भोकांतून एका मागून एक मराठे शिपाई हत्यारबंद असे आंत शिरले व ते तडक पाहिस्तेखानाच्या पलंगा शेजारीं गेले.


पुढें चालू

वऱ्हाडसमाचार

मिती माघ वद्य ३० शके १८२३

## धंदेपट्टी.

धंदेपट्टी ह्मणजे-वार्षिक प्राप्तीवर बसविलेला कर होय. हो धंदेपट्टी शेतकीचा धंदा करणाऱ्यांवर बसवीत नाहींत. सरकारचा सारा ह्मणजे एका प्रकारें शेतकीवर करच असतो. एकाच धंद्यावर अनेक कर असूं नयेत असें मुख्य तत्व आहे आणि त्याला अनुसरूनच धंदेपट्टी शेतकऱ्यावर बसवीत नाहींत. वऱ्हाडांत सरकारची धंदेपट्टी नाहीं, फक्त सरकार आपल्या नोकर मंडळीच्या पगारांतून धंदेपट्टी कापून घेत असतात. वऱ्हाडांत जेथें जेथें मुनिसिपाल कमिट्या आहेत तेथें तेथें पूर्वीं धंदेपट्टी होती. ही धंदेपट्टी आकोल्यास पुष्कळ वर्षांपासून अंमलांत होती. पुढें अशी तक्रार निघाली कीं, सरकारी नोकरा कडून सरकार इन्कम ट्याक्स वसूल करितात तेव्हां यांच्यावर मुनसिपालिटीची धंदेपट्टी आकारूं नये. व असा सरकारच ठरावही प्रसिद्ध झाला. सरकारी नोकरीवर दुहेरी कर बसूं नये असा या ठरावाचा आशय होता. हा ठराव प्रसिद्ध झाल्या नंतर येथील मुनसिपालिटीनें धंदेपट्टी काढून टाकली आणि तिच्या ऐवजीं घरपट्टी बसविण्यांत आली.

घरपट्टीचा वसूल जितका पाहिजे तितका होईना आणि पूर्वींच्या धंदेपट्टीच्या वसुलापेक्षांही कमी रक्कम भरूं लागली ह्मणून घरपट्टीची आकारणी पुष्कळशी वाढविण्यांत आली. त्या शिवाय जनावरपट्टी व गाडीपट्टी असे दोन कर नवीन बसविण्यांत आले. मंगीपट्टीची आकारणीही बरीच फुगविली. अशा रितीनें मुनसिपालिटीनें आपल्या उत्पन्नाची तोंडमिळवणी करण्यासाठीं नाना यत्न करून पाहिले. परंतु त्या प्रयत्नांत जसें यश यावें तसें येत नाहीं याला कारणें अनेक आहेत. सरकारनें मुनसिपालिटीचें उत्पन्न पुष्कळ कमी केलें. जमिनीच्या भाड्याची रक्कम काढून घेण्यांत आली. खर्चाचीं तोंडें भराभर वाढत चाललीं. अशा सरकारी अनास्थेमुळें करांची आकारणी जबरदस्त होऊनही मुनसिपल संस्थेला उत्पन्न पुरेसें होत नाहीं. आकोल्यांतील धुरंधर मंडळी या संस्थेचे चालक आहेत. सर्व कारभार मोठा नामी चालतो. पण उत्पन्नाच्या व खर्चाच्या बाबदींत सर्व सभासदाचे हातपाय गळल्या सारखे झाले आहेत. घरपट्टीचा त्रास फार होतो. तिच्या आकारणी संबंधानें लोकांच्या पुष्कळ कुरकुरी आहेत. जनावरपट्टी व गाडीपट्टी या दोन्ही पट्ट्या शेतकरी लोकांपासून व सुत्र वस्तु लोकांपासून घेऊं नयेत असा आमचा अभिप्राय आहे. जे लोक गाड्या व जनावरें यांच्यावर भाडें उत्पन्न करितात त्यांच्यावर हा कर असावा इतकेंच नाहीं तर मुनसिपल हद्दींत भाडेवाले लोकांस परवान्या शिवाय त्यांचा धंदा करूं देऊं नये. गाड्या चांगल्या धडधाकट आहेत आणि जनावरें शाबूत आहेत अशी खात्री करून नंतर परवाना देण्यांत यावा.

घरपट्टीचा त्रास अनेक प्रकारें आहे. तिची आकारणी नीटशी होत नाहीं. तिच्या पासून घरवाले सुटत नाहींत हें खरें, पण आकोल्यास असे पुष्कळ लोक आहेत कीं, त्यांचें घरदार येथें नाहीं व घरदार असलें तरी घरपट्टी ह्मणजे त्यास कःपदार्थ आहे. ते हजारों रुपयांचा व्यापार करितात व पुष्कळशी संपत्ति मिळवितात तथापि यांस मुनसिपल कर ह्मणण्या सारखा कोणताच द्यावा लागत नाहीं. या शहरीं व्यापाराची पेठ मोठी आहे. घरपट्टीचा अंमल या व्यापारी पेठेवर बिलकूल चालत नाहीं व्यापारी लोकांवर, फ्याक्टरींच्या मालकांवर व तसेच इतर कारखानदारांवर धंदेपट्टी अवश्य असली पाहिजे. घरपट्टीनें या लोकांची आपोआप सुटका होते. घरपट्टीच्या आकारणीचा संबंध व्यापाराच्या लहानमोठेपणाकडे फारसा नसतो. मुनसिपालिटीला ही उत्पन्नाची बाब सोडतां येत नाहीं. अलिशान नामदार कर्नेल बार यांनींही नवीन उत्पन्न वाढविण्याला हीच दिशा दाखविली होती; घरपट्टी कायम ठेवून धंदेपट्टी बसविणें फार अन्यायाचें आहे. पूर्वीं धंदेपट्टी जितकी द्यावी लागत होती त्यापेक्षां पुष्कळसा कमी कर हल्लीं सुखवस्तु लोकांस द्यावा लागतो. घरपट्टीमुळें गरीब लोकांचा चुराडा अधिक झाला असून चांगले चांगले लोक मोठमोठ्या रकमेच्या करांतून सुटले आहेत. घरपट्टी पासून मुनिसिपल करामध्यें एका प्रकारची विषमता उत्पन्न झाली आहे.

आमचा अभिप्राय असा आहे कीं घरपट्टी व धंदेपट्टी या दोन्ही पट्ट्या चालूं कराव्यात पण त्याची अंमलबजावणी अशी असावी कीं दोन्ही पट्ट्या एकाच इसमावर असूं नयेत. प्रथमतः धंदेपट्टी असावी. धंदेपट्टी देण्याला जे लोक असमर्थ ठरतील त्यांच्यावर त्याच्या मालकीच्या घराच्या किंवा ते राहतात त्या घराच्या वार्षिक भाड्याच्या मानानें घरपट्टी बसविण्यांत यावी. सरकारी नोकरावर घरपट्टी असावी, आणि अगदीं कनिष्ठ प्रतीचे लोक खेरिज करून जे धंदेपट्टीच्या सदरांत येत नाहींत त्यांच्यावर घरपट्टी आकारावी. गेल्या वीस वर्षांच्या अनुभवावरून असें दिसून येईल कीं, या दोन्ही करापैकीं एक एक कर वरील रीतीनें सर्व लोकांवर बसेल आणि प्रस्तुतची विषमता नाहींशी होईल. येणेंप्रमाणें उत्पन्नाची रक्कम वाढण्याचा संभव आहे. आमची मुनिसिपल कमिटी या सूचनेचा योग्य विचार करील अशी आह्मांस बळकट आशा आहे.

## ज्योतिष

( आमच्या एका सन्माननीय मित्राकडून )

हिंदुस्थानांत वेदकाला पासून जीं शास्त्रें प्रसिद्ध आहेत त्यांत ज्योतिष शास्त्र फार उपयुक्त असून सर्व शास्त्रापेक्षां फार पुढें गेलें आहे परंतु ह्या शास्त्राचा पाया सर्व तऱ्हेनें गणितावर अवलंबून असल्या कारणानें शके १४४२ पासून शके १८२३ पर्यंत सदरहू गणिता संबंधीं सशास्त्र शोध करणारे किंवा पूर्वींच्या ग्रंथासच चालन देणारे असे गणित ज्योतिषी नावारूपास आलेले असे फार थोडे आहेत, त्यामुळें पूर्वींचें ग्रंथ ह्मणजे शके १०७२ त श्री भास्कराचार्य यांनीं तयार केलेला 'सिद्धांत शिरोमणि' व शके १४३२ पर्यंत गणेश दैवज्ञ यांनीं केलेला 'ग्रहलाघव', ह्या शिवाय दुसरे गणित ग्रंथ तयार करण्या करितां जसा प्रयत्न करणें जरूर होतें तसें प्रयत्न कोणी केले नाहींत त्यामुळें या ग्रंथांत जो फरक पडत गेला तो कायम राहिल्यामुळें अलिकडे जीं पंचागें छापिलीं जातात त्यांत ग्रहांचे अस्त, उदय, ग्रहणें ह्यांत अंतर पडतें, त्यामुळें पुष्कळ प्रकारच्या अडचणा येतात.

अलिकडे ३०।३५ वर्षां पासून छत्रे यांचे केरापंती पंचांग व ३ वर्षां पासून केतकी नांवानें प्रसिद्ध होणारें पंचांग अशीं २ पंचांगें गणिताचे चालन देऊन छापतात परंतु त्याचेकडे सुशिक्षित लोकांचें लक्ष जसें जावें तसें गेलें नाहीं त्यामुळें त्यांच्या मेहनतीचें सार्थक होत नाहीं.

ज्योतिषशास्त्रामध्यें जें गणित आहे तें दोन प्रकारचें आहे. ते प्रकार एक व्यक्त व दुसरे अव्यक्त, व्यक्त गणितांत फक्त आकाशातील ग्रहांचें गणित असतें आणि अव्यक्त गणितांत आकाशांतील ग्रहांचे पृथ्वीवर घडणारे आकर्षण, ज्याला आपण भविष्य समजतो तें असतें. व्यक्त ह्मणजे आकाश गणित बरोबर समजल्याशिवाय अव्यक्त ह्मणजे भविष्य समजत नाहीं. या करितां आकाशाचें गणित ज्या पचांगात असतें तें पंचाग सुधारलें ह्मणजे भविष्य फल बरोबर येईल यांत संशय नाहीं.

भविष्य बरोबर समजण्यापासून लोकांचे पुष्कळ फायदे होतात. कारण या जगांत आपले पुढें जे दिवस येतील ते चांगले असें कळल्यावर मनास समाधान राहतें व वाईट असल्यास तें सोसण्यास मन घट्ट बनतें.

ज्योतिषातील पंचागें हल्लीं चुकलीं आहेत. ग्रंथांचें बरोबर अध्ययन नसतें. पाहिजे त्या गांवचें पंचांग तयार नसतें ( ह्मणजे पंचाग मुंबईचें असतें व त्याच पंचांगावरून दुसरे गांवांत फल सांगतात ) अक्षांश रेखांशा सारख्या महत्वाच्या विषयाच्या अज्ञानामुळें व अशाच पुष्कळ गोष्टींत दुर्लक्ष्य केल्यामुळें ज्योतिषी लोक चुकतात.

ज्योतिष शास्त्रा सारख्या महत्वाच्या विषयास सुशिक्षित लोकांचें सहाय पाहिजे. कारण, ह्याचा व्यासंग जे लोक करतात त्यांची स्थिति अगदीं कनिष्ट प्रतिची असते. त्यांना शिक्षण जसें मिळणें जरूर असतें तसें मिळत नाहीं, त्यांच्या वाचना करिता पुस्तकाचा संग्रह कोठेंही पाहण्यात नाहीं. नवीन शोध करण्याचें ज्ञान त्यांना नसतें व असल्यास पैशा या अडचणीमुळें यंत्रसामुग्री मिळत नाहीं, त्यांना उपजीवनाकारितां लोकाचे दारोदारीं भिक्षकी करीत फिरावें लागतें. अशा अडचणी सूज्ञापुढें ठेविल्या आहेत. करितां मागासलेल्या ज्योतिष शास्त्राच व त्याचा अभ्यास करणाऱ्या ज्योतिषी वर्गाचें ज्या बाजूनें पुनरुज्जीवन होऊन पुन्हां पूर्वीं प्रमाणें तें शास्त्र आपल्या प्रखर तेजानें जगास दिपवील असें सुशिक्षित लोकांनीं करावें ह्मणजे ज्योतिषी चुकतो असें ह्मणत बसण्याची पाळी येणार नाहीं. ज्योतिष शास्त्रावर लोकानीं पूर्ण भरंवसा ठेवून त्याच्या स्वादिष्ट फळांची रुची घेण्याची वेळ कधीं फुकट दवडूं नये. व तज्ज्ञ जनाच्या सहवास लाभाची निरंतरची इच्छा ठेवावी.

# The Berar Samachar

MONDAY MARCH 10 1902

Human life is frail and uncertain and plague illustrates these incidents of life in a striking manner. Plague has had its havoc in other provinces and the sad experiences there of are most appalling & lead us no further in our crusade against the deadly disease. The dreadful mortality of plague is coupled with many a tale of harrowing pain, the ruin of families and the permanent harassment to which a man is made liable. The mysteries of Providence are inscrutable. Human knowledge fails herein to understand the deep meaning of these visitations. Medical science has failed signally to make a correct diagnosis of the fell disease. In its healing art, it shows no progress towards a practical solution. The modern science with its manifold appliances is but nothing when it deals with plague.

The sad experiences of other provinces are so many cautions for us. They wage a war against any precipitate measures of stamping out the disease. The useful system of isolating the victims of plague from the rest of the people is to be put into practice with the least pressure and with the greatest amount of persuation. Segregation might be good in its own way. But the first zeal of medical enthusiasts must be cooled down and then the moderation of preventive measures will render them easily accessible to the people at large.

Plague broke out in certain places on the Railway side from Bhusawal. The beginning was as bad as it can be possibly imagined. The history of plague in other provinces has struck terror in the hearts of the people. The Sanitary department is as well on its alert and is doing its level best to allow the epidemic no further room in our province. All human efforts will be made to secure immunity from plague to the whole province. The District authorities of Buldana and Akola have taken the people into confidence and have explained to them the measures which they have in view for the protection of life. It is further anticipated that the hot season which has already set in will remove all possible apprehensions of the spread of plague in the interior of the province. It is a good sign that ra[illegible] have not been found to die[illegible] [illegible]ambers out of plague. The[illegible] [illegible] Malkapur and Khamgao [illegible] [illegible]e seedling of plague b[illegible] [illegible]est precautions of the C[illegible] [illegible] it is hoped

that it will be rooted out in a few days. Experience has taught us that residence in houses where there are attacks of plague is most pernicious to health and life; and the people w[illegible] not object to vacating the portions affected by plague. The public apprehensions are quietly minimized by the prudence, care and anxiety of the district officers and we wish them every success in the humane work of relieving men from the throes of plague.

The question of poverty is before the Government. Poverty is an admitted fact. The only difference is about the ways and means of improving the condition of the Indian people. The Government have negatived the idea that the land—revenue system is responsible for the pauperization of the nation. We agree with the Goverument that no single cause has contributed to the revolution in the communal system of India. Poverty has changed the aspects of the Indian society and it is further apprehended that with the absence of prompt remedial measures the people will come to the brink of serfdom and total extinction. This is of course a work of long time but that fact does not call the less for an organized effort to improve the material prosperity.

The foremost remedy lies in the removal of the wage—famine. Let other branches of employment be opened for the people. This can be achieved by the teaching of practical sciences and the spread of technical education. Agriculture should be stripped off the over—crowding that all people have effected and have enormously raised the value of land. The money—lenders have no doubt disturbed the ranks of the peasantry but they ought to find a corrective in the displeasure that the Government show by introducing new restrictions and prohibitions against the alienation of land. It is to be noted with a clear precision that the undue appreciation of the possession of land for cultivation has further contributed to work at agriculture even with the minimum of profit. In the absence of a better out—lay for the capital and in the present state of cheap labour available for agriculture, it will be more to the point to notice the sad effects of high assessments when the crops do not fetch a proper value for the invest—ments and do not afford support for the number of mouths that are to be ultimately fed thereon. The light assessments will leave a larger margin of profit into the hands of the holders of land and will enable them to maintain a greater establishment of labourers in agriculture.

By-the-by, it is worth noticing that the people are losers in agriculture as a profession. The work of destruction that the rats commenced in such large numbers have blasted all hopes of the crops. A trip to the jungle will bring before the eye the undermining process of the rats and the cotton that is spread on the ground for no useful purpose. The price of that cotton will not even fetch the cost price of picking it. The Rabbi crop is lost for more than 15 Annas in a rupee, and the Kharip crop has also suffered a deterioration from 4 to 8 Annas in a rupee. The Government have realized the full amount of the land—revenue. After these years of famines and shortage of crops, it is most urgently expected that the Government will show some concessions by way of suspending or remitting some part of the land—demand. We hope that the new rates of assessments will be dis—continued for at least some years to come before the people return to days of plenty and show signs of recupertive powers of paying the land—revenue without the least hesitation.

## वऱ्हाड

हवामान— दिवसा ९;१० वाजल्या पासून उन्हाचा ताप फार कडक वाटूं लागतो, रात्रीं हवेंत थंडपणा लवकर येतो, व पहाटेला काहींशीं थंडीही पडते रोग राईची धास्ती वाटत आहे. सर्व हवाला परमेश्वरावर आहे!

रा. रा. काशीनाथ श्रीराम जठार असि० कमिशनर यांस हैदराबाद्स रेसिडेन्सी बझारच सुपरिन्टेंडेंट नेमून रायचूर छावणीच्या हद्दी संबंधानें जिल्हा माजिस्ट्राचे संपूर्ण अधिकार देण्यांत आले हें कळविण्यास आनंद वाटतो.

रा. रा. रंगनाथ विष्णु डोक्रस, आफि. एक्स्ट्रा असि. कमिशनर यांस वणी जिल्ह्याचे डिस्ट्रिक्ट रजिस्टार नेमिलें.

वऱ्हाडांत हायकोर्ट वकील ३६ व दुसऱ्या प्रतीचे वकील ९३ मिळून १२९ वकिलांस १९०२ सालासाठीं सनदा देण्यांत आल्या आहेत आणि हैदराबादेकरितां ११ हायकोर्ट वकील व ४ दुसऱ्या प्रतीचे वकील मिळून १५ वकील आहेत.

गेल्या दिसेंबर महिन्यांत वऱ्हाड प्रांतांत १३१९१ माणसें जन्मलीं व ७६९६ माणसें मृत झालीं. जननाची संख्या फार वाढली आहे हें विसरतां कामा नये.

गेल्या महिन्याच्या अखेरीला मुनसिपल सभासदांची निवडणूक झाली. त्या निवडानिवडींत बहुमतानें खालील गृहस्थ निवडून आले:—

| रा. रा. | वार्ड |
| --- | --- |
| १ विनायक आपाजी काणे पेनशनर—तहशिलदार.<br>२ गणोबा रावोबा. | १ |
| १ केशव गोविंद दामले हायकोर्ट वकील.<br>२ विठूजी नारायण पेनशनर—तहशिलदार.<br>३ महमदअली दरोगा. | २ रा. |
| १ बळवंत नरसिंह मुधोळकर. | ३ रा. |

फलज्योतिषी—रा० रा० रामचंद्र भिकाजी घोलप व त्यांचे बंधु सितारामशास्त्री असे उभयतां आकोल्यास आले आहेत. यांनीं ज्योतिष शास्त्राचें अध्ययन फार चांगलें केलें आहे त्याचा लाभ लोकांनीं अवश्य करून घ्यावा. गुणपरीक्षणानें गुणीजनास शोभा येते व यशश्री लाभते.

## कार्यक्रमपत्रिका

इलिचपूर ( परतवाडा ) येथें तारीख २९ व ३० मार्च सन १९०२ इ. रोजीं भरणाऱ्या वऱ्हाड हायस्कूल माजी विद्यार्थी समाजाची कार्यक्रमपत्रिका.

तारीख २९ रोजीं:—

| | |
| --- | --- |
| ६ ते ८ | स्नान, चहा, काफी वगैरे. |
| ८ ते १० | स्वागत कमेटी तर्फे भाषण.<br>अध्यक्षाची निवडणूक.<br>पागील सालचा रिपोर्ट वाचणें. |
| १० ते १२ | भोजन |
| १२ ते ३ | पानसुपारी.<br>करमणुकीचे खेळ, गाणें वगैरे. |
| ३ ते ५ | कीर्तन अथवा व्याख्यान. |
| ५ ते ७ | टेनीस वगैरे खेळ. |
| ७ ते ८ | भोजन. |
| १० ते २ | नाटक. |

तारीख ३० रोजीं:—

| | |
| --- | --- |
| ६ ते ८ | स्नान, चहा, काफी वगैरे. |
| ८ ते १० | ग्यादरिंगचे कामकाजा संबंधी सुचना व त्यांचा विचार |
| १० ते १२ | भोजन |
| १२ ते ३ | पानसुपारी, करमणुकीचे खेळ, गाणे. |
| ३ ते ६ | व्याख्यान, उपसंहार. |
| ७ ते ८ | भोजन. |

तारीख ७ मार्च १९०२

N. R. Gadhikar
सेक्रटरी
वऱ्हाड हायस्कूल माजीविद्यार्थी समाज

## नोटीस

रा. रा. रामदत्त किसनदयाल मयत वारस पुत्र १ गोवर्धन २ मारकीनाथ ३ गिरधारीलाल ४ नंदलाल व ५ व्याहारीलाल पैकीं ३।४।५ आ० पालन करणार बंधु गोवर्धन व मारकीनाथ तर्फे मु० तनसुकराय राधा किसन मारवाडी व रामगोपाल सुरजमल मारवाडी. दुकान आकोला यांसः—

खालीं सही करणार याज कडून नोटीस देण्यांत येते कीं आमचा पक्षकार लक्ष्मीनारायण हुकमचंद मारवाडी राहणार आकोले हा अज्ञान होता तेव्हां ता. २१।१०।९८ इसवी रोजीं तुह्मी त्याची पालन करणार आई सुरजीबाई इजपासून रुपये २५०० चे ताबेगहाणखत लिहून घेतलें व त्यांत लिहिलेला गहाण माल व आमचा पक्षकार याचे मालकीचे आकोले येथील कछी बाजारांतील दुकान दोन मजली तुमचे ताब्यांत आहे व त्याचें भाडें गहाणखतांतील शर्ती प्रमाणें तुह्मीच वसूल करून गहाणाचे रुपयांचे फेडींत लावीत आहा व शिवाय घर धाब्याचे वर माडी ताजनापेठ पोलीस चावडी जवळ आमचे ताब्यांत आहे. हिशेबानें तुमचे रुपये १९७५ आमचे पक्षकाराकडेस निघत आहेत अगर हिशेब करून तुमचे जे रुपये निघतील ते आमचा पक्षकार तुह्मांस देण्यास तयार असतां तुह्मी रुपये घेण्याचे नाकारले व गहाण माल सोडून देण्याचें नाकबूल केलें. करितां या नोटिशीनें कळवितों कीं आज तारखे पर्यंत तुमचें देणें वसूल वजा जातां रुपये १९७५ निघत आहेत अगर योग्य हिशेब आह्मांस दाखवून जें तुमचे देणें निघत असेल ती सर्व रकम तुह्मी ही नोटीस पावल्या पासून आठ ८ दिवसांचे आंत घेऊन जावी व आमचे पक्षकाराचा गहाणाचा दस्तैवज परत द्यावा आणि गहाण माल आमचे ताब्यांत द्यावा. हा गहाण माल मी दुसऱ्यास रकम रुपये ४००० चार हजार रुपयास विकण्याचे कबूल केले आहे तुमच्या हयगयीमुळें किंवा तुह्मी आपली चुकती रकम न घेतल्यामुळें गहाणाचा बोजा कायम राहील व माझे खरेदीचे विऱ्हाइक बिघडेल तर त्या संबंधानें माझी जी नुकसानी होईल ती तुह्मास भरून द्यावी लागेल करितां वर लिहिलेले मुदतींत तुह्मी योग्य तजवीज न कराल तर दिवाणी कोर्टांत गहाण सोडवण्याचा दावा करून सर्व इस्टेट पात घेतली जाईल व कोर्ट खर्च व माझे वरील खरेदीच्या व्यवहारा संबंधानें होणारं नुकसान तुह्मा कडून भरून घेतलें जाईल. कळावें. तारीख ५।३।१९०२ इसवी.

सही
लक्ष्मी नारायण हुकुमचंद मारवाडी
राहणार आकोला. तर्फे लक्ष्मण
गोविंद ओक वकील आकोला.

## जाहिरात

अकोले गांवांत प्लेग येऊं नये या करितां गांवांत येणारे लोकांवर नजर ठेवण्याचें कामीं कमेटीस फुकट मदत करण्याची ज्यांची इच्छा असेल त्यांनीं आपलें नांव कमेटीस तारीख १५ चे आंत लेखी कळवावें. काम कोणतें करावें लागेल या संबंधीं ज्यास्त माहिती मे. व्हाइस चेअरमन यांस समक्ष भेटल्यास मिळेल. ता. ७।३।१९०२

Vishnu M. Mahajani
Vice-Chairman
Akola M. Committee.

## जाहिरात.

सर्व देशमुख बंधू—— यांसः—

अनेक रामराम वि. वि. यंदाची देशमुखसभा पारस रेल्वे स्टेशन ता. बाळापूर येथें तारीख ९ एप्रिल १९०२ मित्ती चैत्र शुद्ध १ रोज बुधवारीं भरणार आहे तरी आपण सभेस जरूर जरूर येण्याची कृपा करावी. व पत्ते माहीत नसल्यामुळें चिठ्या जाणार नाहींत त्याची माफी असावी.

आपला
बार्शीटाकळी तारीख १५।२।१९०२ } आनंदराव देशमुख स्थानिक सेक्रेटरी

## कलाशिक्षण

हें मासिक पुस्तक येत्या शके १८२४ च्या चैत्र शुद्ध १ पासून सुरूं होईल. त्यांत देशीधंद्याची माहिती येईल, पुण्यास वर्गणी वर्षाची ८९ बाहेर गांवीं ट. हशिलासह. ८।२. मार्च अखेर वर्गणीदार होणारास प्रिन्सिपाल. गो. ग. आगरकर एम. ए. यांचें चरित्र बक्षीस मिळेल.

संपादक—माधव मेराळ सुरतकर
बुधवारपेठ पुणेसिटी.

## वर्तमानासर

धारवाडचे से० ज० मि० नाइट ह्यांचे उद्गार:—

"मुंबईं आईबापांनीं लहान मुलांच्या अंगावर घातलेले दागिने काढून घेण्यासाठीं त्याचे निर्दयपणानें खून करणाऱ्या मनुष्यांस फांशीची शिक्षा देण्याचा मला ह्या महिन्यांत ही तिसऱ्यांदा पाळी आली आहे. असले भयंकर गुन्हे वारंवार होत असल्या मुळें त्यांचा प्रतीकार करण्याच्या हेतूनें मी अशी सूचना करितों कीं अंगावर सोन्या रूप्याचे दागिने घातलेलें मूल बाहेर दिसलें कीं तो फौजदारी गुन्हा समजून आईबापांवर खटला करून मुलांचे आगावरील दागिने दंडादाखल घेऊन त्यांत शासन करावें, अशा तऱ्हेचा एक नवा कायदा करून त्याची अम्मलबजावणी करण्याचें काम गांवकामगाराकडे सोंपवावें. त्यांचे हातून या कायद्यानें मिळालेल्या अधिकाराचा सदुपयोग होवो अथवा दुरुपयोग होवो फायदाच होणार आहे. कारण गांवकामगारांस वरील अधिकार आहे असें लोकांस एकदां माहीत झालें कीं, सहा महिन्यांचे आंतच मुलें आईबापांचीं दागिने घातलेलीं मुलें घराबाहेर फिरकावयाचींसुद्धां नाहींत. व मग हा कायदा साहजिकच मृतलेख होऊन राहील."

इकडे लक्ष्य द्या— हिंदुस्थानांतील बायका अज्ञान असतात व त्यांची गांजणूक होते असें ह्मणतात, पण त्यांचा छळ बिलकूल होत नाहीं नव्या देशा पेक्षां बायकांना वाईट रीतीनें वागविण्याचें कृत्य जुन्या देशांत ( हिंदुस्थानांत ) अगदींच कमी असतें, आणि नव्या देशां इतका यांत पशुपणाचा भाग नसतो हिंदुस्थानांतील स्त्रीपुरुषांत जें सौख्य व समाजाचा जो थोरपणा असतो आणि हिंदुस्थानांतील स्त्रियांचीं जीं चरित्रें दृष्टीस पडतात तीं पाहिलीं ह्मणजे हिंदु राष्ट्राची ती अति थोरमत्ता आहे असें वाटल्या शिवाय राहत नाहीं. हिंदुस्थानांतल्या स्त्रिया मूढ असतात असा एक जो आरोप केला जातो त्या परतें असत्य तर कोणतेंच नाहीं. त्या अज्ञान असल्या तर या अलीकडल्या धारणाच्या अज्ञान असतात असेंच ह्मटलें पाहिजे. कांहीं स्त्रियांना लिहितां येत नाहीं, आणि कांहींना वाचतां येत नाहीं हें खरें, पण येवढ्या वरूनच कां त्यांना अज्ञान अगर अशिक्षित ह्मणावयाचें ? असें जर ह्मटलें तर ज्या आया, आणि आजा आपल्या घरांतल्या लहान मुलांना भारतांतील, रामायणांतील, पुराणांतील, आणि दुसऱ्या पुण्य कथा सांगतात तीं पुराणें शिक्षण नव्हे, आणि इंग्रजी कल्पित कादंबऱ्या, आणि वजनदार मासिक पुस्तकें वाचणें हेंच शिक्षण होय असें कां समजावयाचें ? हा भ्रांति चमत्कार आमच्या पैकीं कोणी कबूल करील काय ?

योग्य सन्मान— ना० चंदावरकर युनिव्हर्सिटी कमिशनकडे नेमिले आहेत त्या मुदतींत मुंबई हायकोर्टाचे सरकारी वकील रा. ब. कीर्तीकर यांस हायकोर्टाचे जज्ज नेमिलें आहे. ही नेमणूक समाधानकारक झाली यांत संशय नाहीं.

औषधी— बडोद्यास प्लेग येऊं नये ह्मणून बरोबर कडु लिंबाच्या पाल्याची धुरी देतात ह्मणून तेथें प्लेग होत नाहीं अशी कीर्ती पसरली आहे. अनुभव घ्यावा.

नवें यंत्र—नाकाचा आकार हवा तसा बनविण्याचें एक यंत्र व्हिएना येथें बनविण्यांत आलें आहे. आतां नकट्या नाकाचा भिण्याचें कारण उरलें नाहीं.

ग्लॅडस्टन साहेबांचे आयर्लंड विषयींचे विचार आतां कांहीं कामाचे नाहींत. 'लिबरल' पक्षाचा कार्यक्रम आतां पुनः नवीन केला पाहिजे, आयर्लंडांतील लोक उघड उघडपणें ह्मणतात कीं, आह्मी ब्रिटिश साम्राज्याचे शत्रू आहों तेव्हां यांना स्वतंत्र पार्लमेंट देण्यास मी कधींही संमती देणार नाहीं, अशा अर्थाचें लार्ड रोजबरी यांनीं नुकतेंच एक भाषण केलें.

ब्रिटिश सैन्याची निंदा करून बोअर लोकांचे बाजूस धर्म आहे व ह्मणून यांसच अखेर जय येईल अशा मतलबाचें एक पुस्तक एका जर्मन मिशनऱ्यानें लिहिलें व याच्या हजारों प्रती न्यूयॉर्क येथें वांटल्या.

पापाचें प्रायश्चित—नागपूर येथें मारुतीच्या देवळांतील मंडपांत मारवाडी जातीच्या आषक मापुकांनीं परवा एके रात्रीं क्रीडा करण्याचा बेत केला तों इतक्यात सभामंडप एकाएकीं खालीं पडून मारवाडीशेट व यांचे पाखरूं असे दोघेही प्राणास मुकले असें ह्मणतात.

अभिनंदन— पुणें येथील प्रसिद्ध चित्रकार रा. रा. सदाशिव कृष्ण पिंपळखरे यांस लंडन येथील 'सोसायटी फॉर दि एनकरेजमेंट आफ आर्ट, मॅन्युफक्चर्स ॲन्ड कामर्स' या संस्थेचे फेलो निवडण्यांत आलें आहे. हा मान त्यांनीं आपल्या गुणानेंच संपादन केला ही समाधानकारक गोष्ट आहे. व आह्मी मनापासून यांचें अभिनंदन करतों.

योग्य हुकूम— लांबलांबच्या पल्ल्याचा प्रवास करणाऱ्या हिंदुस्थानांतील सर्व आगगाड्यांमध्यें तिसऱ्या वर्गाच्या उतारूंसाठीं शौचकूपाची सोय ताबडतोब करावी असा लॉर्ड कर्झन साहेबांनीं हुकूम केला आहे.

समयसूचकता— ५७ च्या बंडाचे वेळीं लढाईत असलेला सार्जंट ममफोर्ड नुकताच मरण पावला. हा जखमी होऊन रणांगणावर पडला असतां नेटिव शिपाई तेथें आले. त्या वेळीं यानें आपलें रक्त आपल्या तोंडास फासून व मेल्याचें ढोंग करून आपला प्राण वाचविला होता.

अस्वल झाडावर चढलें— गोहटी जिल्ह्यांतील एका चहाच्या मळ्यांतील झाडावर एक कुली चढला होता. याचे केंस लांब सडक असून त्याचा रंग अगदीं काळा होता. यामुळें हा कोणी अस्वल आपल्या झाडावर चढून फळें खात आहे असें वाटून त्या मळ्याच्या युरोपियन म्यानेजरानें दिवसा याला गोळी घातली.

नवें यंत्र— सर हावर्ड ग्रब नांवाच्या एका शास्त्रज्ञानें बंदुकीवर बसविण्याचें एक नवें कांचेचें यंत्र तयार केलें आहे. त्या त्या योगानें पाहिजे याला अचूक नेम मारितां येतो. मग नेम मारण्याचें कौशल्य संपलेंच ह्मणायाचें.

सर्वांत मोठा मोबदला—कृतज्ञता हा होय.

सर्वांत मोठा आशीर्वाद— निरोगी प्रकृति हा होय.

सर्वांत मोठें आश्चर्य— आपण स्वतः हें होय.

सर्वांत मोठें ओझें— सर्व शांतपणें सहन करणें हें होय.

सर्वांत मोठी सेवा— परोपकार ही होय.

सर्वांत मोठें बिकट काम— आपलें कर्तव्य नीट बजावणें हें होय.

सर्वांत मोठा जय— स्वतांचे मनोविकार जिंकणें हा होय.

सर्वांत मोठें दान—परहितार्थ स्वार्थत्याग करणें हें होय.

युरोपियन लोकांमध्यें बोटांत आंगठ्या घालण्याच्या कांहीं ठरीव पद्धति आहेत. जो लग्नाचा उमेदवार असेल तो डाव्या हाताच्या करांगुळीमध्यें आंगठी घालित असतो. ज्याच्या लग्नाचा वाङ्निश्चय वगैरे झालेला असतो तो दुसऱ्या बोटांत आंगठी घालतो. ज्याचें लग्न झालें असेल तो तिसऱ्या बोटांत घालतो आणि आजन्म कौमार्यावस्थेंतच रहाण्याचा ज्याचा इरादा असतो तो आंगठी ४ थ्या बोटांत घालीत असतो.

उपाय—ढेंकूण मारण्याचा असा एक सुलभ उपाय आहे कीं, थोडेसें कारबॉलिक ॲसिड घेऊन यांत त्याच्या तिप्पट पाणी टाकून तें ढेंकणांच्या जागीं लावावें. या योगें ढेंकूण मरतात एवढेंच नव्हे तर यांचा घाणेरडा वासही नाहींसा होतो असें सांगतात.

उंच कारंजें—जपानांत बुद्धाचें एक नामांकित देऊळ आहे. या देवळासमोर एक कारंजें बांधण्यात आलें आहे. त्यांतून १६७ फूट उंच पाणी उडत असतें साऱ्या जगांत इतक्या उंचीवर पाणी उडणारें दुसरें एकहि कारंजें नाहीं ह्मणतात.

चमत्कारिक चाल— बोरनियामध्यें इन्साफ करण्याची एक मजेदार चाल आहे. दोघांचा वाद लागला, व दोघेंही हट्टास पेटले, ह्मणजे यांच्याकडून सारख्या आकाराचे व सारख्या वजनाचे मिठाचे दोन खडे पाण्यांत टाकवितात. ज्याचा खडा अगोदर विरघळेल याचा पक्ष खोटा. हा न्याय खासा !

विलक्षण कायदा— डेन्मार्कमध्यें असा कायदा आहे कीं, छाकटा होऊन रस्त्यावर पडलेल्या इसमास गाडीमध्यें घालून त्याच्या घरीं पोंचवावा आणि ज्या गुत्त्यामध्यें शेवटीं तो दारू प्याला असेल त्याच्यापासून गाडीभाड्याचे पैसे वसूल करावे. ही युरोपियन नीति आणि पद्धति युरोपियनांसच लखलाभ असो.

खरेंच काय— अलाहाबाद येथें प्लेगनें इतका कहर करून सोडला आहे कीं, तें शहर बहुतेक ओसाड पडलें असून प्रेतांच्या दिगारीनीं तळीं भरून गेलीं आहेत असें ह्मणतात.

लोण्याचें झाड— आफ्रिकेंतील जंगलांत एक प्रकारचीं झाडें आहेत त्या झाडास येणारें बी आधण आलेल्या पाण्यांत घालून शिजविलें असतां यापासून उत्तम प्रकारचें लोणी तयार होतें. तें चांगलें स्वादिष्ट, पौष्टिक असतें व पुष्कळ दिवस ठेविलें असतां नासत नाहीं असें तयार होतें ह्मणतात.

भाषावृद्धि—गेल्या ५० वर्षांत इंग्रजी भाषेची आभवृद्धि इतकी झाली आहे कीं A या अक्षराचे ७००० शब्द होते ते आतां ६०००० पर्यंत वाढले आहेत.

फळांचा राजा—मृगांचा राजा जसा सिंह, धान्याचा राजा जोंधळा तसा सर्व फळांचा राजा द्राक्ष होय. आंबे, फणस, केळीं, रामफळ, सिताफळ, नारळ, लिंबू या सर्वांपेक्षां द्राक्षाचे ठिकाणीं अधिक गुण आहेत.

बुंदांच्या विक्र्या:—सध्यां पॅरिसचे लोक बुंदांच्या किंवा काफीचे पानांच्या विड्या करून ओढूं लागले असून त्यांच्या योगानें तंबाखू ओढण्याचें मनुष्याचें व्यसन सुटून असल्या बुंदाचे किंवा काफीच्या विड्यांचे धुरापासून मनुष्याच्या शरिरासही नुकसान होत नाहीं. असा पॅरिसच्या लोकांचा अनुभव आहे.

---

नोटीस

राजश्री अंताजी त्रिंबक ऊर्फ बळवंत त्रिंबक राईलकर वगैरे बंधु ४ राहणार मौजे नाडसूर तालुके सुधागड इलाखा पंतसचीव, यास:—

खालीं सही करणार याजकडून देण्यांत येते कीं, मौजे नाडसूर तालुके सुधागड इलाखा पंतसचीव येथील आमचे वंशपरंपरा मालकीचे राहाते घराचे आवारांत आमचे तीर्थरूपांनीं तुमचे तीर्थरूपांस राहण्यास जागा दिली. त्या जागीं ह्मणजे आमचे आवाराचे मागील बाजूस तुह्मी सुखवस्तु राहात आहां. तुमचे तीर्थरूप त्रिंबकराव जिवंत असतां त्यांनीं ( पुढें भांडण वगैरे न व्हावें ह्मणून ) आह्मांस भाडेचिठी करून दिली. हल्लीं तुमचे तीर्थरूप त्रिंबकराव निवर्तले आहेत. त्यांच्या मागें तुह्मी चौघे बंधू आमच्या आवारात त्याच जागीं राहात आहात. परंतु अलीकडे तुमची बुद्धि फिरली असून आमचे जागेचा अपहार करण्याच्या उद्देशानें तुह्मी, तुमचे तीर्थरूपांनीं आह्मांस दिलेली भाडेचिठी, आमचे बंधु त्रिंबक आपाजी काणे यांज पासून मागुन घेतली, व आतां वर लिहिलेल्या जागेवर घर बांधणार आहां असें समजतें. ह्मणून ही नोटीस दिली आहे. तरी ही नोटीस पावल्या पासून १५ दिवसांचे आंत आमची जागा रिकामी करून द्यावी, व आमचे बंधु त्रिंबकराव यांजपासून तुह्मी मागून घेतलेली भाडेचिठी आह्मास परत देऊन पावती घ्यावी. असें न केल्यास कायद्या प्रमाणें योग्य तजवीज केली जाईल. कळावें तारीख १।३।१९०२इ.

सही

विनायक आपाजी काणे पेनशनर मामलेदार हल्लीं राहणार यवतमाळ.

( प्रांत वऱ्हाड. )

---

☞ हे पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

REGISTERED N. No.

वर्षाची आगाऊ १ हाशील १२
सहामाही „ ३ „ ८८
साल अखेर „ ७ „ १ ८८
किरकोळ अंकास ......................८४

नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस........८१ ८६
दुसरे खेपेस .... .... ....८१

Annual in arrears 7 „ 1 Rs 8 a
Six monthly......... 3 .............. 8 a
Single copy ............................ 4 a

Advertisement
Below 10 lines ...... 2 R
Per line over 10 ......4 a
Repetition Per line ....3 a

# वऱ्हाडसमाचार.

# THE BERAR SAMACHAR

VOL XXXVI AKOLA MONDAY 17 MARCH 1902 NO 11

वर्ष ३६ आकोला सोमवार तारीख १७ माहे मार्च सन १९०२ इ० अंक ११

## मुंबई बॅंकची ठेव ठेवण्याची बॅंक

या सेव्हिंग बॅंक मध्यें खालील अटीवर ठेव ठेविली जाईल.

कोणत्याही एका वर्षात म्हणजे जानेवारी च्या १ ले तारखे पासून तों डिसेंबरच्या ३१ तारखे पर्यंत फक्त एक हजारा पर्यंत रुपये ठेविले जातील.

दोन अथवा अधिक मनुष्यांच्या नावानें देखील एक ठेव ठेवितां येईल. व त्यांच्या हयातींत, तसेंच त्यांचे मागें त्यांच्या पैकीं एकास अथवा अधिक जणांस ठेव काढतां येईल.

एका वर्षात एक हजार रुपया पर्यंत ठेव लेल्या रकमेवर दरसाल दर शेकडां ३ तीन रुपये व्याज दिलें जाईल. मात्र ५००० पाच हजारा वरील रकमेस व्याज नाहीं.

मुंबई ब्यांक आकोला १९ जुलै १८९८ } A. G. Watson Agent.

## खरेदी करा !

### रास्कोपची पेटंट व खरीं पेटंट वाचेस नकली मालास भुलून पैसे खर्चू नका !!!

रेल्वेच्या व इतर अवजड कामास हें वॉच अत्यंत उपयुक्त आहे. हें वॉच पहिल्या प्रतीचें बिनचूक वेळ दाखवितें असून इतर वॉचेस प्रमाणें यास नहमी रिपेरची जरूर नसून या बद्दल विशेष काळजी व लक्ष पुरविण्याची अवश्यकता नाहीं. म्हणून जंगलांत बाहेर फिरणारे लोकांचें तर हें सोबतीच आहे असें अनुभवास आलें आहे. याजकरितां ज्याला आपली वेळ बरोबर राखण्याची जरूरी आहे अशा लोकांस म्हणजे इंजिनियर, कॉंट्र्याक्टर, ओव्हरसियर, फारेस्ट कान्सरव्हेटर व इतर प्रवासी लोकांस हें वॉच घेणें विषयीं आम्ही खात्रीपूर्वक शिफारस करितों. आमची रास्कोपच्या पेटंट वॉचेस संबंधीं याहून जास्त लिहिण्याची जरूरी नाहीं कारण त्याच्या गुणांची प्रचीती तीच आपोआप दाखवितात, इतकें लिहिलें असतां बस्स आहे. हीं घड्याळें आपली स्वतःच शिफारस आजपर्यंत करीत आलीं आहेत, करीत आहेत व पुढेंही अशीच करीत राहतील. प्रत्येक वॉच फार काळजीपूर्वक तपासून चालवून तें वेळ बरोबर दाखवितें अशाबद्दल ग्यारंटी देण्यांत येतें, व त्याबद्दलची जोखीम दारी आमचे शिरावर आहे.

सूचनाः—पुढील नमुना २१ लाईनचें मोठ्या आकाराच्या वॉचचा आहे.



मोठे, मध्यम १६ रु. १७ रु. लहान.

### रोल्ड गोल्ड ४ वर्षांच्या ग्यारंटीचें

१९ लाईन ओपनफेस.........................४०
१९ „ हंटिग...............................५०

### गोल्ड ५ वर्षांच्या ग्यारंटीचें.

१८ लाईन ओपन फेस फिरत्या झांकणाचे ........१५०
१९ „ हंटिग, नकशीचे ............२५०

### मेटलचें तीन वर्षें ग्यारंटीचें.

रास्कॉप पेटंट २१ लाईन एकस्ट्रा स्ट्रांग १८
१९ „ सेकंद कांट्यासह............२०
१९ „ मध्यमागी सेकंद काटा असलेलें ...............२२
१९ „ हाफ् हंटिंगचें................२०
१९ „ हंटिंगचें .........................२०
१४ „ रिस्ट वॉच .....................२०

### इन्यामलेटल ३ वर्षांच्या ग्यारंटीचें

१९ लाईन ऑपनफेस............२०
१९ „ हंटिग.........................२०
१४ „ रिस्टवॉच.........................२०

### सिल्व्हर वाच ४ वर्षांच्या ग्यारंटीचे

१४ लाईन रिस्ट वॉच ............३०
१४ „ हंटिंग..........................३५
१८ व १९ „ ओपनफेस............३०
१९ „ सेकंद कांट्यासह ............३२
१९ „ मध्यमागीं सेकंद कांटा असलेलें .................३५
१९ „ ओंपनफेस सुंदर नकशीचें....३५
१९ „ हंटिंग ......................४९

लेडीज वॉचीस १४, १८, क्यारेटगोल्ड रुपये ६५-२०० पर्यंत.

सी. हिरानागर आणि कंपनी,
ओरिजिनल जिनीवन रास्कोप पेटंट वॉचेसचे सोल एजंट.
५ हार्नबी रोड, मुंबई.

## NOTICE

As the cases of plague are occurring in the District, it is very necessary to carry out sanitary precaution of simple nature such as free ventilation, lime washing, of houses, the cleaning of latrines, the removal of filth and rubblish and of partitions which obstruct light and ventilation. Under rule 99 of the notification No 9 dated 8th January 1902, it is hereby notified that in the Municipal Towns of Akola, Akote, Khamgaon and Shegaon every owner of the house or if the owner be non-resident every occupier shall give effect to the above precautions within eight days from the date of the publication of this notice.

10-3-02 (Sd.) A. C. Currie
for
Deputy Commissioner
Akola.

## जाहिरात

आकोलें जिल्ह्यांत प्लेगचे तापानें लोक आजारी होऊं लागले आहेत सबब साधारण रीतीचीं सफाईचीं कामें, जसें अबाधित हवा खेळविणें, घरांस सफेती देणें, पायखानें स्वच्छ राखणें, घाण व कचरा दूर नेऊन टाकणें, व हवा आणि उजेड याचे मार्गात असलेले प्रतिबंध काढून टाकणें हीं कामें करणें फार जरूर आहे. रे० आरडर नों० नंबर ९ तारीख ८ माहे जानेवारी सन १९०२ इ० चे- जाहिरातींत प्रसिद्ध झालेले नियमां पैकीं नियम ९९ अन्वयें असें जाहिर करण्यांत येतें कीं शेगांव, आकोट, खामगांव आणि आकोलें येथील कमेटीचे हद्दींत राहणारे घर मालकांनीं अथवा मालक नसल्यास त्या घरांत राहणाऱ्या इसमांनीं ह्या नोटिशीचे प्रसिद्धीचे तारखे पासुन आठ दिवसांत वर नमूद केलेलीं कामें करून घ्यावीं. कळावें. तारीख १० माहे मार्च सन १९०२ इ०

Vishnu M. Mahajani
Vice-Chairman
M. Committee Akola.

## मराठे (कुणबी) जातीची सभा

या सभेची तिसरी बैठक मुक्काम शेगांव येथें ता० ५।६ एप्रील सन १९०२ इ० रोजीं रा. रा. तुकाराम शिवराम कोरडे यांच्या अध्यक्षते खालीं भरणार आहे या करितां वऱ्हाड, खानदेश इ० प्रांतांतील कुणबी मंडळींनीं येण्याची कृपा करावी.

शेगांव ता. १९ मार्च सन १९०२ }
हरी कुकाजी पाटील.
कृष्णाजी कडताजी पाटील.
जयराम गोविंद पाटील.
नामदेव सदाशीव वकील.
व्यवस्थापक मंडळी.

ठिकाणः— स्टेशन जवळील धर्मशाळेंत मंडपांत.

## कलाशिक्षण

हें मासिक पुस्तक येत्या शके १८२४ च्या चैत्र शुद्ध १ पासून सुरू होईल. त्यांत देशी धंद्याची माहिती येईल. पुण्यास वर्गणी वर्षाची ८९ बाहेर गांवीं ट. हशिलासह ८१२. मार्च अखेर वर्गणीदार होणारास प्रिन्सिपाल, गो. ग. आगरकर एम. ए यांचें चरित्र बक्षीस मिळेल.

संपादक— माधव मेघाळ सुरतकर बुधवारपेठ पुणेसिटी.

वऱ्हाडसमाचार

मिती माघ वद्य ७ शके १८२३

## लोक गणती.

गेल्या सालीं जी खानेसुमारी झाली तिच्या संबंधानें थोडथोडी माहिती प्रसिद्ध होऊं लागली आहे. जसे जसे माहितीचे तक्ते तयार होतात तसे तसे ते सरकारी ग्याझिटांत छापण्यांत येतात. तारीख १ मार्च १९०१ रोजीं रात्रीं झालेल्या खानेसुमारीचे आंकडे एकत्र करण्यांत आले तेव्हां सर्व इंडियन राष्ट्राची लोकसंख्या २९,४२,६६,७०१ भरली होती. या संख्येचा कच्चा हिशोब घेतां आणि सर्व आंकड्याची पुनः पुनः तपासणी करून पाहतां असें आढळून आलें कीं वरील आंकडा चुकला असून नक्की आंकडा २९,४३६१२,६७६ आहे. या संख्येपैकीं पुरुष १४,९९,५३,७६५ असून १४,४४,०८,९११ स्त्रिया आहेत. इंडियाचें क्षेत्रफळ १७,८६,२९४ चौरस मैल असून २१४७ शहरें व ७,२९,८०३ गांवें आहेत. सर्व राष्ट्रांत एकंदर घरांची संख्या ५,५८,४१,३१५ आहे या वरून वरून असें प्रमाण निघतें

की इंडियांतील प्रत्येक उंबरठा म्हणजे ९ पासून १० माणसांचें एक कुटुंब आहे. इंडियांतील एका कुटुंबांत जशीं पांच सहा माणसें आढळतात तशीं क्वचितच दुसऱ्या राष्ट्रांत आढळतील. इंडिया हें राष्ट्र जगाच्या इतिहासांत इतकें जुनें आहे आणि येथील एकत्रपणानें राहण्याची पद्धती इतर राष्ट्रांनीं कित्ता घेण्यासारखी आहे. कुटुंबाची रचना या देशांत अगदीं प्रेक्षणीय आहे.

इंडियाचे २७ प्रांत करून त्यांचे निरनिराळे आंकडे तपशिलवार दिले आहेत. त्यांचा विचार अन्यत्र आम्ही करूं पण या अंकीं आमच्या प्रांताचे आंकडे खालीं देत आहों. हे आंकडे मनन करण्या सारखे आहेत आणि त्यांचा उपयोग खानेसुमारीचा सर्व रिपोर्ट प्रसिद्ध झाल्यावर चांगला कळून येईल.

वऱ्हाड प्रांताचें क्षेत्रफळ १७७१० चौरस मैल असून त्यांत ४४ शहरें व ५७१० खेडेगांव आहेत. एकंदर गृहसंख्या ५,६७,९१० असून त्या पैकीं ८६७४४ घरें शहरं गांवीं व बाकीचीं ४,८१,१६६ घरें खेडे गांवांत आहेत. साधारण प्रमाणें असें दिसतें कीं, शहरगांवीं जी लोकवस्ती आहे तिच्या पांच साडे पांच पटीनें खेडेगांवची लोकवस्ती आहे. वऱ्हाडची लोकसंख्या २७,५४,०१६ असून त्या पैकीं १३,९४,३०० पुरुष व १३,५९,७१६ स्त्रिया आहेत. सर्व इंडियांतील स्त्रीपुरुषांचें प्रमाण पाहिलें असतां असें आढळून येईल कीं १००० स्त्रिया असल्या तर १०३९ पुरुष असतात.

## राज्यकारभार

वऱ्हाडचा राज्यकारभार अस्सल इंग्रजी प्रमाणेंच चालतो. वऱ्हाड प्रांत छोटा आहे इतर इलाख्या प्रमाणेच तरी येथें सर्व प्रकारचीं छोटेखानी खातीं आहेत. मुंबई, मद्रास बंगाल इत्यादि इलाख्यांचीच सर्व योजना लहानशा नमुन्यावर या प्रांतांत आहे. फक्त फरक एवढाच कीं, वऱ्हाडची स्वतंत्र, अशी एखादी युनिव्हर्सिटी नाहीं. वऱ्हाडचें कायदे – कौंसिल अलिशान रेसिडेंट यांच्या अध्यक्षते खालीं चालतें. कौंसिल म्हणण्यापेक्षां एकटे अलिशान रेसिडेंटच (हें म्हणणें विशेष गोड दिसेल.) सर्व विधायक सत्ता चालवितात कौंसिल नसल्या मुळें वऱ्हाडा साठीं नवीन कायदा करितांना लोकमताचा फारसा कोणी सल्ला घेत नाहींत हें खरें. तथापि सरकार सर्वथैव लोकमत विचारीतच नाहीं असाही प्रकार घडत नसतो. लहानसा व टुमदार हा इलाखा असल्यामुळें राज्यकारभाराचा खर्च मोठा पडतो. अलिकडे वऱ्हाडच्या खर्चा संबंधानें पुष्कळ चौकशी चालू आहे इतर इलाख्याच्या मानानें हा प्रांत म्हणजे एखाद्या जिल्ह्या सारखा आहे. परंतु सरकारी खाती एका स्वतंत्र इलाख्या इतकीं संपूर्ण आहेत, आणि यामुळें पगाराचा बटवडा दरमहा मोठा होऊन विनाकारण खर्चाच्या बाबी फुगल्या आहेत.

हा प्रांत मूळचा निजाम सरकारचा आहे. पण वहिवाटीस इंग्रजांकडे आहे. सध्यां वहिवाट करून जी नक्त शिल्लक राहील ती निजाम सरकारची असा पूर्वी पासूनच ठराव आहे. इंग्रजी वहिवाट फार उत्कृष्ठ आहे आणि या प्रांताला पुढें आणण्यास ही वहिवाटच कारण आहे. थोरले सर सालरजंग होते तेव्हां पासून हा प्रांत परत मिळावा म्हणून नाना खटपटी चालू होत्या. परंतु तो प्रश्न बाजूस टाकल्या सारखा झाला आहे, अलिकडे खर्चाच्या बाजूस आळाच राहिला नाहीं. सरकारी कारभाराच्या पायीं लोक अगदीं नेटीस आले आहेत सरकारी देणें वाढलें आणि लोक गरिबीला पोचले. तेव्हां साहजिकच वऱ्हाडच्या खर्चा संबंधानें विशेष वाटाघाटी होऊं लागल्या. इतर इलाख्यांशीं तुलना करितांना वऱ्हाडचा खर्च फार आहे असें कळून चुकलें, या खर्चाची छाटाछाट कशी करावी या विषयीं सरकारी खलबतें पुष्कळच चालू आहेत. मागें दोन वर्षां पूर्वी निजाम सरकार कलकत्त्यास गेले होते तेव्हां हा प्रश्न अगदीं पुढें आला होता. सध्यां या महिन्यांतच लार्ड कर्झन साहेब हैदराबादेला जाणार आहेत तेव्हां या प्रश्ना संबंधानें पुन्हा भवति न भवति होईल असा पुष्कळांचा तर्क आहे.

सध्यां वऱ्हाड प्रांत निजाम सरकाराला परत देण्याविषयींचा किंतुच आमच्या मनांत येत नाहीं. हा प्रश्न सर सालरजंग यांच्या बरोबरच निकालास लागला असा आमचा पक्का ग्रह आहे. राज्यकारभाराच्या सोयीसाठीं हा प्रांत मुंबई इलाख्याला किंवा मध्यप्रांताला जोडावा असा एक दुसरा प्रश्न आहे. या बाबतींत दोन चार वर्षांत कांहीं तरी फरक होणार आहे हें अगदीं निश्चित आहे. मध्यंतरी अलिशान रेसिडेंट कर्नल बार कलकत्त्याला गेले होते तेव्हां कोणती मसलत कायम ठरली या संबंधानें अजून कोठेंच प्रकार निघत नाहीं. जी गोष्ट गुप्त आहे तिचा स्फोट अवकाळीं होण्यापासून कांहींच फायदा नसतो. थोड्या महिन्यांपासून असाही एक प्रकार लोकवार्तेंत ऐकूं येतो कीं पश्चिम वऱ्हाड मुंबई इलाख्याला जोडून पूर्व वऱ्हाड मध्यप्रांताला जोडण्यांत येईल. सर्वच गोष्टी संभवनीय दिसतात. वऱ्हाडामध्यें इलाख्याच्या कारभाराची जी पद्धती आहे ती मोडण्यापासून खर्चाचीं बरीच तोंडें बंद होतील ही गोष्ट निर्विवाद आहे. आणि तशी व्यवस्था करण्यांत आली तर लोकांच्या तर्फेनें कांहीं कुरकुरी उत्पन्न होतील असेंही आम्हांस वाटत नाहीं. मुंबई किंवा मध्यप्रांत या दोहो पैकीं निवड सरकारानें लोकांचा अभिप्राय घेऊन नंतर करावी अशी आमची प्रार्थना आहे. तशी गोष्ट न घडेल तर एक मोठीच कुरकूर कायम राहील. या प्रांताचे दोन भाग होऊन ते विलग विलग वांटण्यांत येऊं नयेत असा सर्व रयतेचा एक ठाम विचार आहे. विलगपणा जर ठेविला तर आज दोन पिढ्यांचे एकत्रपणाचे संस्कार विलयास जातील. आमच्या प्रांताचा एकत्रपणा मोडण्यांत सरकारालाही मोठासा फायदा नाहीं. एकजीव झालेल्या रयतेच्या वांट्याच्या दोन फळ्या व्हाव्या व त्यांच्यावर दोन स्थानिक सरकारांनीं अंमल चालवावा ही गोष्ट मोठी अनिष्टवह होईल. निवड करण्याचा अधिकार लोकांस दिला तर आमच्या मतें बहुमताचा कल मुंबईपेक्षां मध्यप्रांताकडे अधिक जाईल. वऱ्हाडची भूगोलरचनाच या प्रांताला मध्यप्रांताकडे ओढील. मुंबईचा ओढा या प्रांताला नाहीं असें नाहीं. शाळखात्याची रचना मुंबई युनिव्हरसिटीच्या तंत्रानें चालते. पुष्कळस मुंबईकडचे लोक या प्रांतांत अव्वल इंग्रजीच्या वेळेपासून आले आहेत. त्यांचा कल मुंबईकडे स्वाभाविकपणें जाईल. तथापि लोकसमूह मध्यप्रांताशीं अधिक मिळतो आणि साम्यतेच्या गोष्टी एकत्र केल्या तर मध्यप्रांताशींच वऱ्हाडची सांगड चांगली बसेल.

वरील प्रकार एका जंगी फेरफारा संबंधानें झाला. तो अंमलांत येण्यापूर्वीं वऱ्हाडचे सहा जिल्हे मोडून चार जिल्हे करावे आणि त्या मानानें राज्यकारभाराचा खर्च कमी करावा अशा विषयींचे छापील रिपोर्ट सरकारच्या पुढें आहेतच. या रिपोर्टांतील मुख्य फेरफारांची यादी आम्ही पूर्वींच प्रसिद्ध केली आहे. ही सुधारणा निदान लवकरच होईल या विषयीं सरकारी मत ठरीव आहे. वऱ्हाडच्या राज्यकारभारात विद्यमान काळ मोठ्या क्रांतीचा आहे मागील इतिहासावरून ही क्रांती लाभप्रद होईल असा आम्हांस पक्का भरंवसा आहे. भावी सुखदुःख परमेश्वराला ठाऊक. पण सध्यां वर्तमान स्थितींत फरक होणार आहे ही गोष्ट देखील मोठ्या मौजेची वाटते.

## प्लेगाचा प्रतिकार.

प्लेगाच्या रोगावर औषध नाहीं. हा रोग म्हणजे मृत्यूची रामबाण मात्राच होय. सर्व वैद्यकशास्त्र याच्यापुढें लटपटतें. डाक्टर, हकीम व वैद्य हे सारखेच निरुपयोगी आहेत. अंधाऱ्या रात्रीं मार्ग क्रमणेंच भाग झालें. म्हणजे जसें नक्षत्रांच्या प्रकाशानेंच मार्ग क्रमावा लागतो तद्वतच निरुपायास्तव फक्त वैद्यक शास्त्राच्या धारणानेंच या रोगाचा प्रतिकार करण्याची गोष्ट माणसाच्या हातची आहे. प्रयत्न करितां करितां जी गोष्ट साध्य होईल ती खरी. या अंकीं आम्ही प्लेग संबंधाचे नियम मुद्दाम प्रसिद्ध केले आहेत. ते नियम विचारपूर्वक केले असून लोकांनीं त्या पासून अवश्य तितका बोध घेण्यास चुकूं नये. कुमार श्री हरमामजी यांनीं आपल्या बंगल्यावर मुख्य मुख्य मंडळी जमविली आणि सिव्हिल सर्जनच्या सल्ल्यानें अगदीं सुलभ तितके नियम घालून दिले आहेत. या नियमाला अनुसरून सर्व लोकांनीं वर्तन ठेवावें इतकेंच नाहीं तर सामाजिक कल्याणासाठीं या नियमांचें उल्लंघन न होईल अशी चांगली खबरदारी घ्यावी. बुलढाण्याचे डिपुटी कमिशनर मि रुस्तुमजी साहेब हेही आपल्या समक्ष सिव्हिल सर्जनच्या हातून मलकपुराच्या भागात चांगली व्यवस्था ठेवीत आहेत ही आनंदाची गोष्ट होय. ईश्वर कृपेनें प्लेगासंबंधानें शांतता दिसत आहे आणि लवकरच लोक आनंदानें पूर्ववत् कालक्रमणा करूं लागतील.

## मच्छर

हल्लीं हिंवतापाचा अंमल फार वाढला आहे. तसाच दोषिक ज्वरांचाही ताप वाढत आहे. या ज्वराची पूर्वपीठिका आम्हांस सांगता येत नाहीं तथापि या ज्वराच्या समृद्धी बरोबरच मच्छराची समृद्धि झाली आहे असें निदर्शनास येत आहे. अलिकडील ज्वर प्राणहारक फार होतात असाही अनुभव आला आहे. कोणतीही गोष्ट खरी असो, आमची सूचना एवढीच आहे कीं, अलिकडील शोधा प्रमाणें या तापाचा व मच्छरांचा कांहीं परस्पर पोषणाचा संबंध असेल तर मच्छर मारण्या संबंधीं मुनसिपालिटी व जिल्हा बोर्ड या दोन संस्थांच्या द्वारानीं अवश्य तितके उपाय योजण्याची जलदी करण्यात यावी. थोड्या दिवसापूर्वीं डाक्टर वासुदेवराव भट यांनीं सिव्हिल सर्जन डाक्टर रेली यांच्या अध्यक्षतेखालीं मच्छरा विषयीं चांगली उपयुक्त माहिती दिली होती. ती माहिती आम्ही पूर्वींच प्रसिद्ध केली आहे. सध्या [illegible] तापाचे आजार आहेत अशा वेळीं मच्छरांवर स्वारी करण्याची संधी दवडली न जाईल तर फार बरें होईल.

## दुष्काळ

दुष्काळ नाहीं खरा परंतु सुकाळही नाहीं. ज्या प्रांतांची स्थिती चांगली आहे, पीकपाणी बरें आलें आहे व लोक निदान अन्नासाठीं फिरत नाहींत अशा प्रांतांत देखील सुकाळ आहे असें आमच्या कडून म्हणवत नाहीं. लोकांची दैना बहुगुणित झाली आहे. जरा पिकानें दगा दिला कीं, अठरा विस्वें दारिद्र डोळे वटारून उभें आहे. मुंबई इलाख्यांतील कांहीं भाग, पंजाब, अजमीर, रजपुताना, सेंट्रल इंडिया, बडोदा इत्यादि भागात दुष्काळच पसरला आहे. लोक बेदिल झाले आहेत. रोजगार नाहीं व पोटापाण्याची सोय नाहीं असे सहस्त्रावधि लोक सरकारी मजुरीच्या कामावर दाखल होत आहेत दिवसानुदिवस सरकारी मजुरीवर येणाऱ्या लोकांचा भरणा वाढत चालला आहे. गेल्या मार्च १ च्या अखेरीला दुष्काळाच्या कामावर ३,६९,०१७ लोक जमले आहेत. दुष्काळग्रस्त भागाची लोकसंख्या १,७७,६७,–९१४ आहे. या मानानें हजारा मागें २२–२३ लोक दुष्काळाच्या मजुरीवर गेले आहेत.

अशा बिकट अवस्थेंत सरकारानीं प्रजेविषयीं वात्सल्य मोठें दाखविलें पाहिजे. एका मागून एक अशीं तीन चार वर्षें वाईट गेलीं तर लोकांच्या हातून टिकाव तो कसला धरवणार आहे ! सर्व देशाची भिस्त

शेतीवर अवलंबून आहे अशा वेळीं दुष्काळानें लोकांचा चुराडा होतो इतकेंच नाहीं तर सरकारचा खजिना रिकामाच राहतो. सरकारावर दुष्काळ ह्मणजे मोठेंच अरिष्ट आहे. जेथें आकाशच कोसळलें तेथें सरकार आपलीं अन्नछत्रें घालतें व मजूरीचीं कामें काढतें पण जेथें असाच केवळ प्रसंग ओढवलेला नाहीं तेथें सान्याच्या माफीची योजना सरकारातून अवश्य झाली पाहिजे. वऱ्हाडची दशा या दुसऱ्या प्रकारची आहे पुष्कळ शेतकरी उंदरांच्या अवतापेमुळें अगदीं बुडले आहेत. त्यांच्या हातचें रब्बीचें उत्पन्न उंदिरांनीं हिरावून नेलें आणि खरिपाच्या पिकांचीहि मोठी नासधूस झाली आहे. अशा विपत्कालीं नवा वाढलेला सारा वसूल करण्यांत आला ह्मणजे गळवावर दुसरा फोड उत्पन्न झाल्या प्रमाणें वेदना रयतेनें स्वस्थपणें सोसण्या सारखें आहे. आह्मांस बळकट आशा आहे की, सरकार आमच्या ह्मणण्याचा यथायोग्य विचार करितील आणि रयतेच्या गरिबीवर कृपा प्रसादाचें पांघरूण घालतील.

---

# The Berar Samachar

MONDAY MARCH
17 1902

The University Commission is doing a good work in so far as the inquiry relates to the constitution of the Indian universities and to the possibilities of turning them into teaching bodies as well as corporations formed for exercising a salutary control over the colleges affiliated to them. The proceedings of this Commission we have read with great interest and we hope that some important issues connected with the University education will be brought to a decisive point by way of cut and dry proposals for reforming the working and the constitution of our universities. Realization falls short of expectations. This embodies the world's experience in a pithy manner. A similar remark occurs to our mind when we travel through the learned and academic opinions of witnesses of great renown in India. We welcome these opinions and bow down to the weight of experience and the tone of authority which their exponents have brought to bear upon the evidence they have given before the Commission. We highly value the usefulness of commissions like the University Commission. In the collection of facts and arguments a commission does an immense amount of work. The subject of inquiry is probed into with minute and searching questions. The inquiry begins in the form of a University examination. There is a series of set questions to which answers are expected to be short, concise and accurately to the point. We admit that the system of holding inquiries by commissions is very fine and inviting. The mode is no doubt very excellent.

But the real difficulty begins when we gauge the scope of an inquiry in the light of the different limitations which the resolution appointing a commission lays down for general guidance. The University Commission begins with a short programme of inquiry. The Commission will no doubt submit a long and interesting report but it does not satisfy our interest when it is likely to end in suggestions in which there can be no attempt to extend the patronage of the University towards promoting the spread of technical education in India. We may take up to any model of a Universisy; but we shall not be satisfied if an Indian University does not take the initiative of introducing technical education in India. Nations rise or fall as they keep pace or fail to do so with the material progress which the highly developed state of our modern sciences and appliances have brought to light. India is purely agricultural. Her old industries are events of history. The development of India in point of material wealth is stagnant and shows no signs of a further progress. India illustrates the conditions into which a dying nation runs for want of a better employment of its people. The millions of people go through a life of hard labour, and are hardly able to raise their heads above penury and poverty of an alarming nature. India is in fact a nation of hunger-worn people. If the University Commission holds forth no proposal of ameliorating their lot in life we do not think that a Uuniversity justifies its existence. If education does not stand the test of modern requirements it serves no ussful purpose in so for as it becomes a manufactry of producing good servants for the Government and a bright array of pleaders and doctors. The western nations have laid down what great things a nation can achieve through the spread of technical education. Japan is again an oriental nation that sets a noble example. Technical education is to be our next saviour. We shall be worthy sons of India if we gain a firm hold of our own markets and drive away the wares of other nations. A high time has come for sacrificing every dear thing to attain to the result of producing Indian goods at any cost. The war of India is against foreigners who have usurped her markets. We do not hope to rise if our universities do not impart such an education as will enable our people to cope with the present and future difficulties of a keen and powerful competition of the west. We hope that Lord Curzon will see his way to introduce a new departure in the curriculum of the Indian Universities.

## वऱ्हाड

हवामान— दिवसा ऊन फार कडक असतें. रात्रीं थंडपणा लवकर येतो आणि पहाटेला थंडी विशेष असते. मध्यंतरी आभाळ येत असे आणि सकाळीं थंडगार वाराही सुटत असे. हवामान बरेंच बदललें आहे. हिंवतापाचा आजार फार झाला आहे.

खामगांवास गेल्या तीन दिवसांत प्लेगाचा आजार नाहीं. चांगली शांतता आहे. एकंदर आजपर्यंत हा रोग ९३ माणसांला झाला व त्यांपैकीं ४३ इसम मरण पावले. शनैः शनैः हा रोग चालूंच आहे.

रा. रा. विष्णु रंगनाथ शेवेकर एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनर, आकोला हे अडीच महिन्यांच्या रजेवर पुढील महिन्यापासून जात आहेत.

त्यांच्या रजेंत रा. रा. गोपाळ वामन बापट बी. ए. एल. एल. बी हे रजेवरून परत येऊन आकोल्याच्या कोर्टावर रुजूं होतील.

रा० रा० लक्ष्मण गोपाळ देशपांडे हे रजेवरून परत येऊन बाळापुरास तहशिलदारीचे जागीं रुजूं झाले.

आणि आक्टिंग तहशिलदार रा० रा० दवलत झाबाजी हे पूर्ववत् नायब तहशिलदारीचे कामीं रुजूं झाले.

मि० बी. क्ले असिस्टंट कमिशनर, वाशिम हे रजेवर जात आहेत आणि त्यांच्या रजेंत मि० सेफुद्दीन खान तहशिलदार, आकोला यांस वाशिमास एक्स्ट्रा असि० कमिशनर नेमून आकोल्याच्या तहशिलदारीवर बाळापूरचे नायब तहशिलदार मि० फरुकहुसेन यांस बढती देण्यांत येणार आहे.

रा० रा० रामकृष्ण अमृत देशपांडे नायब तहशिलदार, मलकापूर यांची बदली वणीस होत असून वणीचे नायब तहशिलदार मि० अबदूल अझिज यांस मलकापुरास बदलण्यांत येणार आहे.

| दालसाकेतुध्वज | १४×२० | ऽ१२ | ४३ | योगी गोपीचंद | १४×२० | ऽ८ | ७६ | गोदोहन | १०×१४ | ऽ३ |
| रातभिल्ली | १४×२० | ऽ१२ | ४४ | मानिनी | १४×२० | ऽ८ | ७७ | सरस्वती [ मयूरारूढ ] | १०×१४ | ऽ४ |
| धाकृष्ण | २१×२९ | २ | ४५ | सुशीला | १४×२० | ऽ८ | ७८ | गंगाभीष्म | १०×१४ | ऽ४ |
| कुंतलाजन्म | १४×२० | १ऽ४ | ४६ | रामधनुर्विद्याशिक्षण | १४×२० | ऽ८ | ७९ | परशुराम | १०×१४ | ऽ३ |
| क्ष्मी | १४×२० | १ | ४७ | गंगावतरण | २२×३५ | ४ | ८० | शेषनारायण | १४×२० | ऽ८ |
| रस्वती | १४×२० | १ | ४८ | ना. बा. गं. टिळक | ८×१० | ऽ१॥ | ८१ | महादेव पार्वती | १०×१४ | ऽ१॥ |
| शोदाकृष्ण | १४×२० | १ | ४९ | मार्कंडेय | १४×२० | ऽ८ | ८२ | वनवासी राम | १०×१४ | ऽ१॥ |
| शिवाजीमहाराज | २१×२९ | २ | ५० | ट्रान्सवाल लढाईचा देखावा | २२×३० | ऽ१० | ८३ | शेषशाई | १०×१४ | ऽ१॥ |
| नका शकुंतलासहित | १४×२० | ऽ१२ | ५१ | रत्नावली | १४×२० | ऽ८ | ८४ | रामदास | १०×१४ | ऽ१॥ |
| लोत्तमा | १४×२० | ऽ१२ | ५२ | उषास्वप्न | १४×२० | ऽ८ | ८५ | गोपी गाऱ्हाणीं | १४×२० | ऽ३ |
| र्वशी | १४×२० | ऽ१२ | ५३ | प्रियदर्शिका | १४×२० | ऽ८ | ८६ | कृष्णलीला[गोपिवस्त्रहरण] | १४×२० | ऽ३ |
| भा | १४×२० | ऽ१२ | ५४ | मनोरमा | १४×२० | ऽ८ | ८७ | कली अवतार | १०×१४ | ऽ१॥ |
| संतसेना | १४×२० | ऽ१२ | ५५ | मोहिनी | २३×३५ | | ८८ | कंसवध | १०×१४ | ऽ१॥ |
| लती | १४×२० | ऽ१२ | ५६ | पद्मिणी | १२×२४ | ऽ१२ | ८९ | पंचदेवता | १४×२० | ऽ३ |
| हिल्या | १४×२० | ऽ८ | ५७ | वारिणी | १२×२४ | ऽ१२ | ९० | मलबारी सौंदर्य | १०×१४ | ऽ३ |
| देष्णा--द्रौपदी | १४×२० | ऽ८ | ५८ | वासंतिका | १२+२४ | ऽ१२ | ९१ | पारसी ,, | १०×१४ | ऽ३ |
| त्तात्रेय | १४×२० | ऽ८ | ५९ | उर्वशी | १०×१४ | ऽ४ | ९२ | गौरी | १०×१४ | ऽ१॥ |
| ावित्री | १४×२० | ऽ८ | ६० | लक्ष्मी | १०×१४ | ऽ४ | ९३ | शिवाजी महाराज | १०×१४ | ऽ२ |
| ारा | १४×१० | ऽ३ | ६१ | कालिया-मर्दन | १०×१४ | ऽ४ | ९४ | गोवर्धनलाल | १०×१४ | ऽ२ |
| ीतासुवर्णमृग | १४×१० | ऽ३ | ६२ | तिलोत्तमा. | १०×१४ | ऽ४ | ९५ | शंकर-भिल्लीण | १०×१४ | ऽ२ |
| कृष्णक्रीडा | १४×१० | ऽ३ | ६३ | मेनका-शकुंतला. | १०×१४ | ऽ४ | ९६ | गणपती | १०×१४ | ऽ२ |
| हाश्वेता | १४×१० | ऽ३ | ६४ | गजगौरी. | १०×१४ | ऽ४ | ९७ | भरतभेट | १०×१४ | ऽ२ |
| ादंबरी | १४×१० | ऽ३ | ६५ | सरस्वती | १०×१४ | ऽ४ | ९८ | हरिहर भेट | १०×१४ | ऽ२ |
| ीता | १४×१० | ऽ३ | ६६ | रंभा | १०×१४ | ऽ४ | ९९ | हंसदमयंती | १४×२० | ।॥।. |

## कमिशनएजन्सी.

आमचेकडे पुस्तकांचे व चित्रांचे मालाशिवाय इतर हरएक तऱ्हेचा माल ( हिंदुधर्मास आड न येणारा मागविल्यास पाठवूं. हरएक तऱ्हेचा माल ह्मणजे सोनें चांदीचे डागडागिने; चांदी, पितळ व तांबें या धातूचीं भांडीं; त्याचप्रमाणें मूर्ति, नाशिक व सांगलीचीं भांडीं, उपकर्णी, लांकडी सामान ( मुलांचीं खेळणीं, खुर्च्या, टेबलें, कोचें वगैरे ); सुती, रेशमी व जरतारी देशी व विलायती कापड; पगड्या; टोप्या; उदबत्त्या; अत्तरें, मुरावळे, गुलकंद वगैरे देशी व विलायती; सर्व जातींचें सुगंधी सामान देशी सुवासिक साबण, पांच, मोतिया, हिना वगैरे वासांचें; टाईमपीसेस, क्लाक्स, वॉचेस, शेडे, विळ्या, फळफळावळ, स्टेशनरी सामान, शिळा व छापखान्यास लागणारे कागद, शाई, वगैरे सर्व जातीचें सामान आमचेकडे मागविल्यास आह्मी खरेदी करून वक्तशीर व व्यवस्थेनें पाठवित जाऊं. माल मागविणारापासून जें कमिशन घेण्यांत येईल, त्याचे दर खालीं लिहिल्याप्रमाणें:—

कमिशनचे दर—१ रु. पासून ५ रु. पर्यंत दर रुपयास एक आणा, ५ रु. पासून १० रु. पर्यंत दर रुपयास पाऊण आणा. १० रु. पासून २५ रु. पर्यंत दर रुपयास आर्धा आणा. २५ रु. पासून १०० रु. पर्यंत दर रुपयास पाव आणा, व यापुढें दर शेंकडा १ऽ४प्रमाणें कमिशन घेऊं.

दहा रुपयेपर्यंत माल मागविणाराकडे व्ही. पी. नें माल पाठवूं. परंतु दहा रुपयांवर जास्त माल मागविणारांनीं रोख रुपये आगाऊ पाठविले पाहिजेत.

---

## दिवाळीकरितां उत्तम सुगंधी सामान.

सर्व प्रकाचीं अत्तरें, मसाल्याचें तेल, आंवळ्याचें तेल, उदबत्त्या, अगरबत्त्या, केशर, केशरी गोळ्या व मुरंबे वगैरे हरएक प्रकारचा माल स्वस्तदरानें पाठवूं.

पत्ता—सन्मार्गदर्शक मंडळी.
रविवार पेठ फडक्याचे गेटाजवळ.

# रबरी शिक्के.

इंग्रजी, मराठी, गुजराथी, टायपांत उत्तम तऱ्हेचे रबरी शिक्के तयार करून दिले जातील.

रबरी शिक्क्यासोबत तांबडी, हिरवी, जांभळी, यांपैकीं शाईची एक बाटली, ब्रश, प्याडचा डबा फुकट मिळेल.

...हीं हा कारखाना नवीनच सुरू केला आहे. परगांवच्या लोकांस आमचेकडून तयार झालेला शिक्का अद्याप मिळाला नाहीं. रबरी शिक्क्याचें सर्व सामान नवीन असल्यामुळें उत्तम तऱ्हेचा टिकाऊ शिक्का तयार होतो. ...व्यापारी, बुकसेलर, कुळकर्णी, किरकोळ दुकानदार, मामलेदार, वगैरे लोकांनीं आपल्या नांवाचा रबर स्टांप तयार करून घ्यावा. पत्रावर, अर्जावर, शिक्का मारल्यापासून विशेष शोभा येऊन आपलें नांव दुस... ...स्पष्ट कळतें.

## रबरी शिक्क्याचे नमुने.




नं. १ किं. ३ रु.




नं. २ किं. २॥ रु.




नं. ३ किं. २॥ रु.




नं. ४ किं. २॥ रु.




नंबर ५ किं. २ रु.




नं. ६ किं. २ रु.




नं. ७ किं. २ रु.




नं. ८ किं. २ रु.




नं. ९ किं. १॥ रु.




नंबर १० किं. १॥ रु.




नंबर ११ किं. १ रु.

राजनिशी फुकट.

**तुपे** यांची उत्तम निळी काळी व तांबडी शाई .॥।. ची घेणारांस हतीमताई कादंबरी. १ रु. ची घेणारांस शिवलीलामृत. १ऽ८ ची घेणारांस संतलीलामृत किंवा दासबोध. २ रु. ची घेणारांस श्रीरामविजय किंवा हरिविजय. २ऽ८ ची घेणारांस पांडवप्रताप किंवा गुरुचरित्र अथवा जैमि. अश्वमेध बक्षीस देवूं.
पत्ता—सन्मार्गदर्शक मंडळी पुणें.

आजपर्यंत ९०० शेंवर खपले,

## पाकीट प्रेस.

**(खिशांतील लहानसा छापखाना.)**

*A. E. I. O. U. Y.* हीं नेहमीं लागणारीं अक्षरें जास्तीं व बाकीचीं अक्षरें बेताचीं पुरेशीं व्यवस्थेंत बसविलेलीं असून चिन्हें वगैरे सर्व असतात ) व आपणास हवे ते टाईप जुळवून टाईप पक्के न हालेसे बसविण्यासारखी नवी कंपोजपटी म्हणजे स्टीक असून टाईप काढणें व पुनः जागचे जागीं ठेवण्याचा चिमटा; शाईचा पॅड; ब्रश व शाईची बाटली याप्रमाणें सामान असतें, ही पेटी खिशांतील डायरीएवढी असते. किं० ४। रु० ट०ख० ऽ७.

## वर्तमानसार.

कैसाळच्या संस्थानिकांचे अध्यक्षतेखालीं मराठे सरदार व इतर लोक यांची कोल्हापूरास सभा भरून इंग्लंडांतून परत आल्यावर कोल्हापूरचे महाराजांचें स्वागत करून त्यांस व कोल्हापूर येथील युरोपियनांस मेजवानी देण्याचें ठरलें. ४००० रु. वर्गणी त्याचवेळीं जमली.

मुंबई हायकोर्टांत गेल्या १ ल्या तारखेपासून जज्जांचे निकाल उतरून घेण्यासाठीं १५० रु. पगाराच्या लघुलिपि लेखकांच्या दोन जागा नवीन केल्या आहेत. अशा आणखी दोन जागा होणार आहेत असें समजतें.

यापुढें ९ नवंबर अथवा २४ मे रोजीं सरकारी कचेऱ्यांस वगैरे सुट्या न मिळतां बादशहाच्या जन्म दिवसाची सुट्टी हिंदुस्थानांत ता० ३० मे रोजीं द्यावयाची असें ठरलें आहे.

कंदास्वामी पिलेप्रमाणेंच मि. क्लेमंट्स नांवाच्या एका इंग्रज शास्त्रज्ञानेंही, हिंदुस्थानांत ता. ३१ जुलै आणि ता. ११, १७, २३, व ३१ आगस्ट रोजीं धरणीकंप होईल असें भाकीत केलें आहे!

...ता:—सन्मार्गदर्शक मंडळी रविवार पेठ ...

सहामाही „ ३ „ ८८
साल अखेर „ ७ „ १ ८८
किरकोळ अंकास ........................८४

नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस.........८१ ८६
दुसरे खेपेस .... .... ....८१

Six monthly.........3 ............... 8 as
Single copy ............................ 4 as

Advertisement
Below 10 lines ...... 2 Rs
Per line over 10 ......4 as
Repetition Per line.....8 as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOL XXXVI AKOLA MONDAY 24 MARCH 1902 NO 12

वर्ष ३६ आकोला सोमवार तारीख २४ माहे मार्च सन १९०२ इ० अंक १२

### मुंबई बॅंकची ठेव ठेवण्याची बॅंक

या सेव्हिंग बॅंक मध्यें खालील अटीवर ठेव ठेविली जाईल.

कोणत्याही एका वर्षात ह्मणजे जानेवारीच्या १ ले तारखे पासून तों दिसेंबरच्या ३१ तारखे पर्यंत फक्त एक हजारा पर्यंत रुपये ठेविले जातील.

दोन अथवा अधिक मनुष्यांच्या नावानें देखील एक ठेव ठेवितां येईल. व त्यांच्या हयातींत, तसेंच त्यांचे मार्गे त्यांच्या पैकीं एकास अथवा अधिक जणांस ठेव काढतां येईल.

एका वर्षात एक हजार रुपयापर्यंत ठेव लेल्या रकमेवर दरसाल दर शेकडा ३ तीन रुपये व्याज दिलें जाईल. मात्र ५००० पाच हजारा वरील रकमेस व्याज नाहीं.

मुंबई ब्यांक आकोला १९ जुलै १८९८ } A. G. Watson Agent.

---

### खरेदी करा !

### रासकोपची थेट व खरीं पेटंट वाचेस

### नकली मालास भुलून पैसे खर्चूं नका !!!

रेल्वेच्या व इतर अवजड कामास हेंच वॉच अत्यंत उपयुक्त आहे. हें वॉच पहिल्या प्रतीचें बिनचूक वेळ दाखविणारें असून इतर वॉचेस प्रमाणें यांस नेहमीं रिपेरची जरूर नसन या बद्दल विशेष काळजी व लक्ष पुरविण्याची अवश्यकता नाहीं. ह्मणून जंगलांत बाहेर फिरणारे लोकांचें तर हें सोबतीच आहे असें अनुभवास आलें आहे. याजकरितां ज्याला आपली वेळ बरोबर राखण्याची जरूरी आहे अशा लोकांस ह्मणजे इंजिनियर, कॉंट्र्याक्टर, ओव्हरसियर, फारेस्ट कान्सरव्हेटर व इतर प्रवासी लोकांस हें वॉच घेणें विषयीं आह्मी खात्रीपूर्वक शिफारस करितों. आमची **रास्कोपच्या पेटंट वॉचेस** संबंधीं याहून जास्त लिहिण्याची जरूरी नाहीं कारण त्याच्या गुणांची प्रचीति तींच आपोआप दाखवितात, इतकें लिहिलें असतां बस्स आहे. हीं घड्याळें आपली स्वतःच शिफारस आजपर्यंत करीत आलीं आहेत, करीत आहेत व पुढेंही अशीच करीत राहतील. प्रत्येक वॉच फार काळजीपूर्वक तपासून पारखून तें वेळ बरोबर दाखविते अशाबद्दल ग्यारंटी देण्यांत येतें, व त्याबद्दलची जोखीमदारी आमचे शिरावर आहे.

**सूचनाः**—पुढील नमुना २१ लाईनच्या मोठ्या आकाराच्या वॉचचा आहे.



मोठे, मध्यम १६ रु. १७ रु. लहान.

**रोल्ड गोल्ड ४ वर्षांच्या ग्यारंटीचें**

१९ लाईन ओपनफेस........................४०
१९ „ हंटिंग..............................५०

**गोल्ड ५ वर्षांच्या ग्यारंटीचें.**

१८ लाईन ओपन फेस फिरत्या झांकणाचे ........१५०
१९ „ हंटिंग, नकशीचे ...........२५०

**मेटलचें तीन वर्षे ग्यारंटीचें.**

रास्कॉप पेटंट २१ लाईन एक्स्ट्रा स्ट्रांग १८
१९ „ सेंकंद कांट्यासह..........२०
१९ „ मध्यभागी सेंकंद काटा असलेलें ................२२
१९ „ हाफ् हंटिंगचें.............२०
१९ „ हंटिंगचें ....................२०
१४ „ रिस्ट वॉच ..................२०

**इनुगनमेटल ३ वर्षांच्या ग्यारंटीचें**

१९ लाईन ओंपन फेस...........२०
१९ „ हंटिंग.......................२०
१४ „ रिस्टवॉच....................२०

**सिल्व्हर वाच ४ वर्षांच्या ग्यारंटीचे**

१४ लाईन रिस्ट वॉच ...........३०
१४ „ हंटिंग.........................३५
१८ व १९ „ ओंपनफेस...........३०
१९ „ सेकंद कांट्यासह ...........३२
१९ „ मध्यभागीं सेंकंद कांटा असलेलें ................३५
१९ „ ओंपनफेस सुंदर नकशीचें....३५
१९ „ हंटिंग .................... ४९

लेडीज वॉचीस १४, १८, क्योरटगोल्ड रुपये ६५–२०० पर्यंत.

**सी. हीनीगर आणि कंपनी,**
ओरिजिनल जिनीयन रास्कोप पेटंट वॉचेसचे सोल एजंट,
९ हार्नबी रोड, मुंबई.

### नोटीस

नोटीस बेशमी रुखमाई मर्द कृष्णाजी उकळकार राहणार बेलमंडळी ता० मुर्तिजापूर पोस्ट कारंजा. इस:—

खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येतें कीं तूं माझी सापत्न माता आहेस. माझा बाप कृष्णाजी उकळकार हा मरण पावल्यास सुमारे सहा सात महिने झाले. त्यानें मरण्याचे आगाऊ पंचा समक्ष पोलिस ह्मणजे मला इस्टेट सर्व देऊन शेतें २ दोन ह्मणजे सर्वे नंबर ४ एकर गुंठे १४–१५ आकार रुपये १३ चे व बापुज्या मोठ्या राहणार वडई ता० आकोला याचे पासून एक शेत खरेदी घेतले ते नांवें करून घ्याचे तसेंच राहिलें. ते व घरांतील इस्टेट सुमारे १००० रुपयाची माझ्या नांवें करून देण्याचा त्याचा विचार होता. व तुला मी आजन्म अन्नवस्त्र पुरवावें असें त्यानें ठरविलें होतें. परंतु अकस्मात माझा बाप मरण पावल्यामुळें सर्व विचार जागच्या जागीच राहिला. करितां या नोटिशीनें कळविण्यांत येते कीं सर्व इस्टेट माझ्या स्वाधिन करून आजन्म अन्न वस्त्र मजपासून तूं घ्यावेस. कारण तुझ्या पोटी मुलींच संतान नाहीं सबब मी सर्व इस्टेटचों मालकीण आहे. करितां तूं घरांतील कोणताही जिन्नस शेत वगैरे माझ्या परवानगी वाचून विकूं नये. विकल्यास तुला जबाबदार धरलें जाईल व जो कोणी तुज पासून इस्टेटी पैकीं कांहीं गहाण अगर खरेदी करील तर त्याचा तो जबाबदार राहील. कळावें. तारीख १९ माहे मार्च सन १९०२ इ.

सही
तुळशी मर्द देवाजी लाडसे रहाणार बेलमंडळी ता. मुर्तिजापूर निशाणी खुद्द हातची बांगडी.

---

### नोटीस

राजश्री रावोबा वल्लद गोविंदा वाढी झाडे आडनांव वाढेर राहणार कसबे बेरी तालुका केळापूर जिल्हा वणी यांस:—

खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं मी तुमची लग्नाची बायको असून आज वयात येऊन चार वर्षे झालीं. त्यांत एक वर्षभर मी वयांत आल्यावर तुमच्याशी सर्व प्रकारचा व्यवहार झाला व फळशोभनही झालें. नंतर मी बिमार पडले. त्यांत तुमच्या घरीं तुमच्या मायबापांनीं माझी बिलकूल अव्यवस्था केली व तुह्मी ही लक्ष पुरविलें नाहीं. नंतर माझ्या मायनें आपल्या घरीं नेऊन माझी व्यवस्था केली. त्या दिवसा पासून आज तीन वर्षे झाली व तुह्मी दुसरी बायको ही केली. माझ्याशीं संबंध ठेवला नाहीं. आतां मी आपल्या मायच्या घरीं तिच्या पदरेच खाऊन दिवस काढीत आहे. माझ्या मायला उदर भरण्याचा मोल मजुरी शिवाय दुसरा कोणताच मार्ग नाहीं व तीही विधवा आहे त्यामुळें माझ्या मायला मजकरतां १०० शंभर रुपये खर्च आला. आतां विनंती हीच कीं तुह्मांला जर चांगले वागविणें असेल तर तुह्मी माझ्या मायला मजकरतां लागलेला खर्च देऊन मला आजपासून आठ दिवसांचे आंत घेऊन जाणे. मी नवीतरणी आहे तर या स्थितींत किती दिवस रहावें जर आज पासून आठ दिवसांचे आंत तुह्मी वरील करारामप्रमाणें न न्याल तर हीच फारकत समजून मी दुसरा नवरा करीन. या शिवाय नोटीशीचा खर्च तुह्मांस द्यावा लागेल. कळावें. तारीख १९ माहे मार्च सन १९०२ इ०

सहीची बांगडी नलगी मर्द रावोबा वाढीन राहणार बेरी हिचे हातची असे.

---

### नोटीस

रा० रा० संपत वल्लद गंगाराम पाटील राहणार बांगरगांव तालुके आकोट पोस्ट तेल्हारा यांस:—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येतें कीं मौजे बांगरगांव येथील शेतें ३ सर्वे नंबर ४ व ८ व ८१ असे तीन नंबर तुह्मी तारीख २।३।०० रोजीं ८०० आठशें रुपयास ताबेगहाण करून आह्मास दिलें. त्यांचा करार असा होता कीं माझ्या रकमेस व्याज व तुमचे पिकास नांव नाहीं ह्मणून तीच शेतें तुह्मास आह्मी त्याच दिवशीं तुह्मापासून पट्टलेख लिहून घेऊन २०६–१।–३ ससाऱ्यासुद्धां तुह्मास वहितीस दिलीं. त्या प्रमाणें तुह्मी आह्मास सन १९०० सालाचे पीकाबद्दल तारीख ६।१।०१ रोजीं २०६–१।–३ दिले व आह्मापासून तुह्मी पावती घेतली. पुढें १९०१ सालीं पट्टलेख लिहून देऊन जमीन वाहावी व त्याबद्दल करारशीर पैसे द्यावे तसे तुह्मी न करितां तशीच जमिन वाहिली व पैसेही आतां पावेतो दिले नाहींत करितां या नोटिशीनें कळविण्यांत येते कीं सदर्हू आमचीं शेतें आमच्या ताब्यांत द्यावी व नुकसानी बद्दल ४०० चारशे रुपये द्यावे. असे आठ दिवसाचे आंत न केल्यास रीतशीर फिर्याद करून जमीन ताब्यांत घेऊन नुकसानी बद्दल ४०० रुपये भरून घेऊन कोर्टखर्ची सुद्धां व या नोटिशीच्या खर्चों सुद्धां तुह्मापासून रुपये भरून घेतले जातील कळावे. तारीख २०।३।०२ इसवी.

सही
किसनीराम लछमनदास दुकान तेल्हारा दस्तुर खुद्द.

वऱ्हाडसमाचार

मिती फाल्गुन शुद्ध १५ शके १८२३

## इंडिया बजेट

हिंदुस्थान सरकारचा आदा जसा मोठा आहे तसा व्ययही मोठाच आहे. हिंदुस्थानच्या जमाखर्चाचे आंकडे ह्मणजे जगांतील एका मोठ्या अफाट राष्ट्राचा जमाखर्च होय. पुष्कळांस मोठमोठ्या गोष्टींची खरी कल्पना नसते. ही कल्पना जमाखर्चाच्या आंकड्यावरून घेण्यासारखी आहे. सन १९०२-०३ साळच्या जमाखर्चाचें अंदाजपत्रक व्हाइसरायच्या कायदे-कौंसिलापुढें नुकतेंच मांडण्यांत आलें आहे आणि त्या संबंधानें येत्या बुधवारीं कौंसिलदार मंडळी वादविवाद करणार आहेत. या वादविवादाची सखळी समजण्यापूर्वी कांहीं ठोकळ गोष्टी माहीत असाव्या लागतात आणि त्या गोष्टी कळविण्याचा आज आह्मी विचार केला आहे.

जमाखर्ची साल देशरिवाजा प्रमाणें निरनिराळें असतें किंत्येक दुकानदार, पेढीवाले व कारखानदार यांचें जमाखर्ची साल दिवाळीच्या पाडव्याला सुरू होतें. कित्येकांचें हिशोबी साल चैत्रांतील पाडव्याला सुरू होतें आणि कित्येक आपला हिशाब इंग्रजी वर्ष प्रतिपदे पासून नवा सुरू करितात. आमच्या सरकारचें साल एप्रिलच्या १ ले तारखेला सुरू होतें. असा विशेष ठेवण्याचें कारण जमाखर्चाची सोय होय. इंडियाचें मुख्य उत्पन्न सान्याच्या रूपानें मोठें आहे, आणि हा सारा मार्च अखेरीला सर्व वसूल होतो. हा वसूल लक्ष्यांत घेऊन नंतर मार्च अखेरीला संपणारे सालाची ताळेबंदी नीटपणें करितां येते. या व्यवस्थेनें देखील हिशोब जोडण्याला पुरेसा वेळ मिळत नाहीं ह्मणून हिशोबी साल आगष्ट पासून सुरू करावें असा पुष्कळशा सरकारी अधिकाऱ्यांचा अभिप्राय आहे.

सरकारी जमाखर्चाची रीत मोठी उत्कृष्ठ आहे. पुढें येणाऱ्या सालाबद्दल जमाखर्चाचें अंदाज पत्रक तयार होत असतें. चालूं सालचे नऊ महिने झाल्या नंतर नऊ महिन्यांचे पक्के आंकडे घेऊन नऊ महिन्यांच्या अनुभवानें बाकी राहिलेल्या तीन महिन्याच्या नक्की आंकड्यांचा अंदाजा काढतात आणि या रीतीनें चालूं सालचा हिशोबी खर्डा तयार करितात. तसेंच संपूर्ण झालेल्या वर्षाचे पक्के जमाखर्चही तयार असतात. या पद्धतीनें १९००-०१ सालचा पक्का जमाखर्च, १९०१-०२ सालचा कच्चा जमाखर्च व १९०२-०३ सालचा जमाखर्ची खर्डा असे तीन ताळेबंद एकदम सरकारं तयार करीत असतात. भावी सालचा जमाखर्ची अंदाजा मोठ्या कुशाग्रतेनें करावा लागतो. या अंदाजाच्या खर्ड्यांवर हिंदुस्थानच्या फडणिसाच्या दूरदर्शीपणाची व मुत्सद्दीपणाची परीक्षाच व्हावयाची असते. कोट्यावधी रुपयांच्या बडामोडी व्हावयाच्या असतात पण त्या जमाखर्चाच्या यंत्रांतून अगदीं शिस्तवारीनें होत असतात हें राज्यकर्त्यांचें अलौकिक चातुर्य होय.

हिंदुस्थानचे फडणीस नामदार लॉ साहेब यांनीं सालत्रयीचा जमाखर्च इंडियाच्या कायदे-कौंसिला पुढें मांडला आहे. या जमाखर्चांतील माहिती पौंडांत दिलेली आहे. याची कल्पना रुपयांत होण्याला १ पौंड ह्मणजे १५ रुपये या प्रमाणानें पौंडांचे रुपये समजले पाहिजेत.

| | पौंड | |
|---|---|---|
| १९००-०१ | ७,९२,७१,२०१ | उत्पन्न |
| | ७,३६,०२,०८७ | खर्च |
| | १६,७०,२०४ | शिल्लक |
| १९०१-०२ | ७,६५,४६,७०० | उत्पन्न |
| | ७,१८,७३,८०० | खर्च |
| | ४६,७२,९०० | शिल्लक. |
| १९०२-०३ | ७,४३,७०,४०० | उत्पन्न |
| ( अंदाजा ) | ७,३५,३२,७०० | खर्च |
| | ८,३७,७०० | शिल्लक. |

वरील तिन्ही सालच्या आंकड्या वरून ही गोष्ट निश्चित दिसते कीं, दुष्काळच्या खर्चाची पूर्णता केल्या नंतर लागलींच पाठोपाठ आलेल्या दोन्ही वर्षांचा जमाखर्च फार समाधानकारक आहे. दुष्काळा नंतरच्या सालीं अडीच कोट रुपये शिलकींत राहिले. चालू मार्च अखेरीलाही सात कोटी रुपये शिल्लक राहतील असा अंदाजा आहे. पुढील सालींही १११॥ कोट रुपयांतून ११०। कोट रुपये खर्च वजा जातां बाकी १।. कोट रुपये शिल्लक राहतील.

आदा व व्यय यांची ही गोळाबेरीज पाहून कोणाही चतुर फडणिसाला आनंद व समाधान वाटल्यावांचून राहणार नाहीं. अशा या आनंदाच्या हिशोबांत नामदार लॉ साहेब लिहितात कीं एकंदरीनें इंडियाची सांपत्तिक स्थिती फार उत्कृष्ठ आहे. तिचा उत्कृष्ठपणा असा आहे कीं दुष्काळानें कोरडा पडलेला सांपत्तिक झरा मोठ्या प्रवाहाच्या रूपानें पूर्ववत दिसूं लागला आहे. सरकारी उत्पन्न पुष्कळ वाढलें असून सरकारच्या खजिन्यांत ७ कोटी वर रुपये शिल्लक या सालीं रहात आहेत ही गोष्ट सांपत्तिक उन्नति पूर्ववत् होत असल्याचें सिद्ध करीत आहे. हे विचार ह्मणजे केवळ कल्पनासृष्टीचेच तरंग नाहींत. चालूं सालीं पीकपाणी मध्यमच आहे आणि सर्व देशाची मुख्य दौलत जी शेती तीही बरीशी पिकली नाहीं तथापि गोळा बेरजेनें देशाची सांपत्तिक स्थिती पुष्कळशी सुधरली असून उत्तरोत्तर अभिवृद्धीला पोचत आहे.

हे विचार मनाला आल्हादकारक वाटतात. पण वस्तुस्थिती या विचारांतील चित्रापेक्षां अगदीं निराळी आहे. लोकांची गरिबी फार आहे. उपासमारीनें लक्षावधी लोक मृत्युमुखीं पडण्यांच्या मार्गाला लागले आहेत. पहिली चूक ही होते कीं सरकारी जमाखर्च ह्मणजे आपण लोकस्थितीचा आरसा समजतो. सरकारी जमाखर्ची अबादानी ह्मणजे लोकांची सुखसंपन्नता नव्हे. लोकांवरील कराचा बोजा पुष्कळ वाढविला, व लोकांकडील सरकारी करभार तसदीनें व कडकपणानें वसूल करण्यांत आला ह्मणजे सरकारी जमाखर्चाचे कागद चांगले सुवर्णमय दिसतील, परंतु या बरोबर रयतेची समाधानी व श्रीमंती वृद्धि पावत आहे असें होत नाहीं. रयतेचें दोहन फार केलें तर तिचा पुढचणा कांहीं कालपावेतों दुग्धसमृद्धि करील, तथापि प्रजारूपी कामधेनूच कृश, सत्वहीन व मृत्युवश होत चालली आहे हा अनुभव विसरतां कामा नये. नामदार लॉ साहेब यांस हा अनुभव खरा वाटत नाहीं हें आमच्या देशाचें दुर्भाग्य होय. जेथें सरकारी दृष्टीला सर्वत्र श्रीलक्ष्मी दिसते; तेथेच रयतेच्या दृष्टीला सर्वत्र तिच्या थोरल्या बहिणीच्या लीला दिसतात. हा दृष्टिदोष ईश्वरकृपेनें जेव्हां नाहींसा होईल तो आमचा भाग्याचा उदय काळ होय।

## मिठावरील कर

या कराचें उत्पन्न फार दांडगें आहे. जमिनीच्या साऱ्याचें उत्पन्नाच्या ⅓ उत्पन्नापेक्षां हें थोडेंसें अधिकच आहे. १९००-०१ सालीं हें उत्पन्न ५९,६७,०३४ पौंड ह्मणजे ८,९५,०१,५१० रुपये अगर जवळ जवळ ९ कोट रुपये झालें. चालू सालीं हें उत्पन्न ५९,९६,७८० पौंड ह्मणजे ८,९९,५०,१०० रुपये होइल. भावी १९०२-०३ सालच्या अंदाजांतही हें उत्पन्न तितकेंच होईल असें मानण्याला हरकत नाहीं. दुष्काळामुळें हें उत्पन्न दोन वर्षां पूर्वीं कमी झालें होतें पण थोडीशी अबादानी होऊं लागतांच मिठावरील कराचें उत्पन्न पुन्हां वाढण्याला सुरुवात झाली. जसजसा रेल्वेचा प्रसार होतो तसतसे मीठ स्वस्त दरानें बाहेर प्रांतीं जाऊं लागतें. या कारणामुळेंही मिठाच्या उत्पन्नांत वाढवा आलेला आहे. मिठावरील कराचें उत्पन्न वाढलें याचा अर्थ लोक सुखी होऊं लागले असा कित्येक लोक समजतात, पण ही मोठी चूक आहे. दुष्काळांत अन्नच मिळत नव्हतें तेव्हां लोक मीठ कमी खात होते हें उघड आहे. मीठ हा पदार्थ अत्यावश्यक आहे; आणि तो टाकतां येण्यासारखा नाहीं. माणूस ओली कोरडी भाकर खाऊं लागला तरी त्याला मीठ लागतें. दुष्काळ संपल्या बरोबर लोकांस जेवण्यास मिळूं लागलें आणि लागलींच मिठाचा उपयोग पूर्ववत् होऊं लागला. मिठावरील उत्पन्न वाढलें यांत कांहीं विशेष नाहीं. मिठावर सरकारी कर असा इंडियातच आहे. पृथ्वीवरील दुसऱ्या राष्ट्रांत कोठेंही हा कर नाहीं. प्राणिमात्राच्या साधारण उपयोगांतील पदार्थांवर असा कर असूं नये असा अर्थशास्त्राचा सिद्धांत आहे. नऊ कोट रुपये करमिठासाठीं प्रजेला द्यावा लागतो. ही रकम आणखी दुप्पट केली तरी होण्या सारखी आहे. मिठा वाचून सर्वांचेंच नडणार आहे. या कराचा बोजा श्रीमंतांवर व गरिबांवर सारखाच बसतो ही कदाचित् समता दिसत असेल परंतु या समदृष्टीनें सरकार विषमता अधिकाधिक वाढवीत आहे.

## दगडी स्मारक

पुण्यश्लोक नृपाला दगडी स्मारक लागत नाहीं. त्याची सत्कृतीच त्याला अजरामर करिते अशीच गोष्ट कैलासवासी व्हिक्टोरिआ चक्रवर्तिणीची आहे. त्यांस दगडी स्मारक नको. त्यांच्या प्रजावात्सल्याला अनुरूप असेंच स्मारक पाहिजे. प्रजेची उणीव दूर करणारी चिरस्थायी संस्था व्हिक्टोरिआ नांवानें आह्मांला अवश्य पाहिजे. कलकत्यास ८२ हजार रुपये वर्गणी गोळा करून गेल्या बुधवारीं त्यांचा पुतळा उभारण्यांत आला. तो पुतळा लोकदृष्टी पुढें उघडा करितांना लार्ड कर्झन साहेबांनीं मोठें वक्तृत्व केलें आहे आणि पुतळ्याचें स्मारक प्रतिपादिलें आहे. या सरकारी विचारापुढें व पुतळ्याच्या वर्गणीदारांपुढें आह्मी प्रतिकूळ अभिप्राय सांगण्यापासून कांहीं लाभ होण्याचा संभव नाहीं. तसेंच स्मारका संबंधानें व्हिक्टोरिआचा भव्य बंगला बांधण्यांत येणार आहे तीहि गोष्ट आह्मांस संमत नाहीं. इमारतीच्या स्मारकाचा काल निघून गेला आहे. इंडियांत सुंदर भवनें पुष्कळ आहेत. व्हिक्टोरिआचें स्मारक औद्योगिक पाठशाळेच्या रूपानें होईल तर त्यांत सर्व देशाचें कोट कल्याण आहे. सर्व देशाची सांपत्तिक स्थिती सुधारण्याची जीवन कळा जर 'व्हिक्टोरिआ' या गोड नाममहिम्यानें मिळेल तर लार्ड कर्झन साहेबांचे या देशावर मोठे उपकार होतील. त्यांची सत्ता आहे तेव्हां त्याचा शद्ध खालीं पडणार नाहीं हे खरें परंतु त्यांच्या सत्तेला लोकसंमतीची श्री जर संप्राप्त होईल तर ती सत्ता उभयपक्षीं मोठी आनंदप्रद होईल. दगडी स्मारकाचा छंद लार्ड कर्झन साहेब सोडतील तर फार बरें होईल।

## आनंदकला

आनंदकला ही जगाची चालक शक्ती आहे. आनंद उपभोगण्याच्या रीती देखील मोठ्या गूढ आहेत. आनंदाची वाटणी करण्यानें आनंद कमी न होतां तो बहुगुणित होतो. आनंदाची वाटणी करणारा मात्र मोठा कुशल व चतुर असावा लागतो. आमचे चक्रवर्ती बादशहा एडवर्ड यांच्या अंगीं ही चतुरस्रता मोठी आहे. राज्याभिषेकाच्या मंगल दिवशीं ह्मणजे तारीख २६ जून रोजीं ते लंडन शहरच्या गोरगरिबांस जेवणावळी देणार आहेत. अभिषेकाच्या मंगल गोष्टीला या अन्नसंतर्पणानें मांगल्य विशेष येईल उघड आहे. आनंदसमयीं प्रजेची संतुष्टी संपादण्यानें राजे साहेबाचा आनंद फार वाढेल हें स्पष्ट आहे. त्या सुसमयाचा लाभ आमच्या देशाला अन्नदानानें राजेसाहेबांनीं द्यावा अशी आमची त्यांस प्रार्थना आहे. इंडियाची गरीब प्रजा आपल्या आशीर्वादांनीं सर्व नभोमंडळ भरून टाकील आणि त्या योगानें तो आनंदोत्सव गगनांत मावेनासा होईल. दिल्लीच्या दरबाराच्या वेळींही असाच सुयोग जुळवून आणण्यास आमचे व्हाइसराय चुकणार नाहींत अशी आह्मास पक्की उमेद आहे.

मनीआरडरीचे व व्हाल्युपेबलावर पडणा ऱ्या हांशिलांचे दर बदलण्यांत आले आहेत. हे नवे दर पुढील महिन्यापासून अंमलांत येतील. हे दर येणें प्रमाणें:—

| | पोस्टाचें हांशिल |
|---|---|
| ५ रुपया पर्यंत | १ आणा |
| पुढे १० रुपया पर्यंत | २ आणे |
| पुढे २५ रुपया पर्यंत | ४ आणे |

पुढे प्रत्येकीं २५ रुपयास ४ आणे पडतील परंतु २५ रुपयांहून अधिक असलेली रकम १० रुपयापर्यंत अधिक असेल तर दोन आणे पडतील व दहा पेक्षां अधिक असेल तर चार आणे पडतील. हा फेरफार फार चांगला होत आहे.

आह्मांस लिहिण्यास दुःख वाटतें कीं पुण्याच्या धानवृक्ष पत्राचे मालक रा. रा. माळू गोविंद सापकर यांस संग्रहणीच्या आजारानें गेल्या आठवड्यांत देवाज्ञा झाली. राजश्री माळूसाहेब सापकर हे उदार स्वभावाचे होते हें खरें तथापि त्यांच्या सारखे कार्यकर्ते व जुने पत्रकार मृत्युंगत झाले हें पाहून मराठी पत्रकर्त्यांस दुःख झाल्या वांचून राहणार नाहीं. त्यांच्या वर्तमानपत्राची संस्था उत्तरोत्तर उन्नतीला येईल तर त्यांच्या आप्तमित्रांनीं त्यांचें ऋण स्मरल्या सारखें होणार आहे !

OURSELVES

Our subscribers will, we hope, allow us the usual Holika holidays which they have hitherto done ungrudgingly. As our offices will be closed for these days no paper will be issued on the 31st. instant.

# The Berar Samachar

MONDAY MARCH 24 1902

The India Budget for 1902—03 is now published and will be discussed on Wednesday next in the Imperial Legislative Council. The budget is most hopeful and the optimism of the Financier Sir E. Law is of a most sanguine nature. He raises a note of caution but with all his limitations of ill fortune he predicts a bright future. He re-asserts that there is an extra ordinary recuperative power of India as a whole. The economic situation of India holds forth a promise of excellent prospects of an enviable surplus over the expenditure at the end of the next financial year. Sir Law is most lucky in his budget and is to be congratulated upon such a clean sheet of accounts. He has made out a capital argument from the rise in revenue from the customs. He remarks in the following strain of an easy—going economist:—

"Now, we have heard a good many arguments about the poverty or prosperity of India; but I have not seen or heard any founded on the growth or falling—off of our imports. And yet, what greater test can there be of progress or decay than the consuming and purchasing power of a people. India has this year shown clearly that its consuming and purchasing power is rapidly increasing, and when we examine the classes of articles for which this increasing demand has mainly arisen, and for which this increasing purchasing power has been found, it is evident that it is not the wants, or contents of the pockets of the European population, that have appreciably affected the result. It must be admitted by the most sceptical, that it is the requirments and the purchasing power of the indigenous population which are practically alone responsible for the satisfactory results attained.

From this he proceeds to make a forecast of the economic progress of the next year. He observes:—

"I have already quoted remarkable figures of our Customs Revenue, showing the increasing purchasing power of the mass of the community. Our latest figures show also steady improvements in the revenue from Stamps. Excise, Post Office and other Departments, whilst the great increase in Railway traffic, and the brisk trade, dependent, in great measure, on exports of produce, appear conclusive, as regards the generally satisfactory yield of the soil, in all those districts which have escaped the influence of abnormally unfavourable climatic conditions.

As I stated twelve months ago, the prosperity of the agriculturtal population, must, from the financial, as well as from other points of view, be the deepest concern of the Government of India. There are no heroic measures which Government can usefully take for the direct assistance of agriculture and the agricultural community. We have, however, done what is possible, without stint of our resources, to improve communications for the transport of produce to open new lands to cultivation by irrigation, to improve others by irrigation, and to alleviate the burden of land assessments where, through exceptional circumstances, it has been thought that it might temporarily press too severely; we are endeavouring to work out a system of credit for the ryot; and we are looking forward to securing gradual improvement in agricultural methods by the introduction of more scientific methods."

It is not that he is ignorant of and has lost sympathy for suffering groups and classes. But he shuffles off this suffering minority with a free stroke of his law of averages. The balance of movement is in favour of the general economy of this extensive empire with its hundreds of millions of inhabitants. We do not subscribe to the optimism of the Government because we face in actual life a set of opposite circumstances and we cannot but confess to the extreme poverty of the people. Our only sorrow is for the happy ignorance into which the Government glide themselves. Unless this attitude of the Government is changed we do not hope for any useful reform in the administration. We must try to supply the Government a new stand—point from which things can be viewed in their real light.

## *HOUSE—SANITATION*

(Communicated)

There is a good deal of illness in the city at present. The cause of illness is the fever of the causation of which we have been hearing so much of late. It is worse in that part of our city which has small narrow lanes and back to back houses some of them containing each a number of inhabitants which for sanitary considerations should not be allowed. The trade of Akola is increasing and one would naturally expect larger influx of people; but, is there sufficient accomodation for the increasing population? We think not. The house—rents in Akola being high and the number of available houses small, the result is over—crowding of the same, with all its results. We are glad to hear that the Municipality is going to purchase land to enable working classes to build their houses there. It would have been better if the Board themselves could build cottages for them, which it cannot do owing to its Financial conditions. But if the Municipality cannot, the people can help the working classes in that line. We have philanthrophists who if they wish can build houses for them on sanitary principles rented on reasonable terms. The better class of people can help to improve the sanitary condition of the city by removing themselves to less crowded places and leave the old ones to be occupied for the less deserving. Merchants who have their own factories in Akola can also help to the sam end. The amount and quality of work done depends upon the health of the workmen and if there be good cottages built for their workmen and rent them on reasonable sums they would not only deserve thanks but shall have the satisfaction of having done something to ameliorate the condition of a class of people who deserve the sympathy of us all.

We have only elementary knowledge of house—sanitation and an ambitious land—lord who builds houses "to be let" being careful to see that it costs him least to construct and bring him most in return, never cares for sanitation at all. We would like to see the Municipal Committee stepping in and make every new house to fulfill necessary sanitary requirements and the old ones to provide sufficient light and ventilation, and restrict the number of inhabitants in each house.

There is another inconvenience under which the poorer population are labouring. The better classes have their medical man who visits them during their serious illness, while the poorer have the treatment only till they can walk to the dispensary. Fortunate is he if he has some body to attend on him, or you can conceive the state of a man seriously ill lying by himself in his room with perhaps some body to bring medicine but no body to diagnose his disease, watch his condition frequently and treat him accordingly. The Municipality can help such class of people by having a medical man to visit them. We are aware we have a Civil Hospital where in—door patients are taken, but this is known to very few, and there may be cases, which may not be sent in as in-door patients but all the same want visiting at their homes. We learn that the Municipal authorities are going to take steps to remove breeding pools of mosquitoes. We are now glad to learn that they are also going to remove congestion by purchasing land in healthy quarters for workmens' dwellings. only. We would like to see these things done sooner.

## वऱ्हाड

सुट्टी— होळिकापूजन, व रंगपंचमी या दोन महोत्सवा निमित्त पुढील सप्तकाची सुट्टी आह्मी घेतली आहे. कार्याच्या सोयीनें ही मामुली सुट्टी आह्मी घेत असल्यामुळें तारीख ३१ मार्च रोजीं वऱ्हाडसमाचारचा अंक निघणार नाहीं.

रा. रा. विठ्ठल नारायण काळीकर आफि० ए० असि० कमिशनर दर्यापूर हे मोर्शीच्या कोर्टावर गेले असून मि० मीर अनवर अल्ली ए० असि० कमिशनर हे दर्यापूरच्या कोर्टावर आले आहेत.

मि० वुलियमसन डेपुटी कान्सरव्हेटर यांस तीन महिन्यांची हक्काची रजा व ५ महिने १८ दिवसांची फर्लो रजा या दोन्ही एकामागून एक देण्यांत आल्या.

राय साहेब नारायणसिंग बभूतसिंग आफि० एक्स्ट्रा असि० कमिशनर, मेहेकर यांस गेल्या २१ वे तारखेपासून वीस दिवसांची रजा देण्यांत आली आहे.

मि० फ्रान्सिस डायरेक्टर आफ लँड रिकार्ड यांस एप्रिलच्या १ ले तारखे पासून आठ महिन्यांची फर्लो रजा देण्यांत आली असून त्यांच्या जागीं मि० मार्शल साहेब यानीं डायरेक्टरचें काम करावें असें ठरलें.

सर्व्हे हेड क्वाटर कडील काम संपल्या मुळें तारीख १ एप्रिल पासून शेतकी खात्या ची ही शाखा अजिबात काढून टाकण्यांत येणार आहे. सरासरी १०।११ कारकून कमी होणार आहेत तर त्यांची सात आठ वर्षांची जुनी नोकरी लक्ष्यांत घेऊन त्यांची नेमणूक इतरत्र करण्यांत येईल तर त्या गरीब लोकांवर सरकारचें मोठे उपकार होतील.

वऱ्हाड प्रांताला लागणारे हास्पिटल असिस्टंट तयार करण्यासाठीं हैदराबादेस वैद्यकाची शाळा आहे. या शाळेला दोन विद्यार्थ्यांची जरूर आहे. म्हणून विद्यार्थ्यांची निवड करण्यापूर्वी त्यांची लायकी पाहण्यासाठीं तारीख १५ एप्रिल रोजी उमरावतीस होतकरू हास्पिटल असिस्टंटांची परीक्षा घेण्यांत येईल. या परीक्षेला लागणाऱ्या विषयांची माहिती गेल्या रेसिडेन्सी आरडरी मध्यें छापलेली आहे.

मलकापूरास दोन तीन इसमांस प्रत्यहीं प्लेगाचा आजार होत असतो. खामगांवास प्लेगाची समाप्ती झाली होती, परंतु पुन्हां शुक्रवारीं दोन तीन माणसास प्लेग झाल्यामुळें या रोगाची भिती दुणावली आहे. ईश्वर ठेवील तसें राहिलें पाहिजे !

मे० इलियट कमिशनर साहेब यांची स्वारी आकोल्यास आली आहे.

नोटीस.

रा० रा० राजाराम यशवंत देशमुख राहणार गोळेगांव. यांस:—

या लेखानें कळविण्यांत येते कीं तुह्मी आपल्या दोन सोबत्यांच्या साह्यानें खरेदी घतलेल्या शेता संबंधानें मी दिवाणींत दावा तुह्मावर केला आहे. त्या शेतांतील काटवण तुह्मी कापून तोडून नेत आहां. तसें करूं नये, तुह्मावर कोर्टाचा मनाईचा हुकूम येई पर्यंत जें नुकसान तुह्मी कराल तें तुह्माकडून या नोटिशीच्या खर्चासुद्धां भरून घेतलें जाईल. कळावें. ता. २२।३।०२ इ.

सही.

सोनाजी वल्लद परशराम

राहणार कानीखेड

वर्तमानसार

आकड्यांची मौजः—

पहिली.

१×९+२=११
१२×९+३=१११
१२३×९+४=११११
१२३४×९+५=१११११
१२३४५×९+६=११११११
१२३४५६×९+७=१११११११
१२३४५६७×९+८=११११११११
१२३४५६७८×९+९=१११११११११

दुसरी

१×८+१=९
१२×८+२=९८
१२३×८+३=९८७
१२३४×८+४=९८७६
१२३४५×८+५=९८७६५
१२३४५६×८+६=९८७६५४
१२३४५६७×८+७=९८७६५४३
१२३४५६७८×८+८=९८७६५४३२
१२३४५६७८९×८+९=९८७६५४३२१

## लढाई

लार्ड मॅथ्यून (प्रसिद्ध इंग्रजी सरदार) यास डीलारी (बोअर सरदार) यानें पकडलें. या बातमीनें सर्व जगास आश्चर्यचकित करून टाकिलें आहे. बोअर लढाई बहुतेक संपत आली आहे; बोअर लोकांची संख्यांची हालचाल केवळ नांवाची आहे; तींत कांहीं राम नाहीं, इत्यादि ज्या बातम्या वारंवार इकडे येत असत, त्या सर्व खोट्या आहेत. समरांगणावर कांहीं निराळाच प्रकार चालला आहे, असें दिसतें. लॉर्ड मथ्यूनसारखा इंग्रजांचा बडा सरदार लढाई बंद होण्याच्या वेळीं तोफा, लोक, व सामानसुमान यांसह अचानक शत्रूंनीं धरून कैद करावा, ही गोष्ट सामान्य नव्हे. बोअर लोकांनीं गनीमी काव्यानें लढाई करण्यास सुरवात केल्यापासून आश्चर्यचकित करणारे अनेक प्रकार त्यांनीं केले व करीत आहेत; पण दोन लक्ष इंग्रजी सेनेकडून त्याचा बंदोबस्त एक वर्षांतही झाला नाहीं. अर्थात लढाई संपल्याची अनुमानें करणें सर्वस्वी चुकीचें आहे. रोज येणाऱ्या बातम्यांवरून इंग्रजांचा पाय ट्रान्सव्हालमध्यें पुरा टेकल्याचेंही दिसत नाहीं. लॉर्ड मथ्यून सारख्या पहिल्या प्रतीच्या सरदारास दुर्बळ झालेल्या बोअर सेनेनें दिवसा ढवळ्या कैद करून नेलें, तर इंग्रजांचें दोन लक्ष सैन्य निरुपयोगी आहे, असें ह्मणावयाचें काय?

खरी थोरवी— बोअर लोक जसे छातीचे शूर सरदार तसेच मनाचे मोठे दिलदार आहेत. लार्ड म्याथ्यून सारखा पराक्रमी मोहरा हातांत पडला असतांही कांहीं एक अट न घालतां त्यास त्यांनीं मोकळे केलें ही बातमी अत्यानंदाची होय. आतां तरी इंग्रज लोक बोअर लोकांचे सरदार सोडून देऊन त्यांच्याशीं सख्य जोडतील व त्यांचे उतराई होतील काय?

डीवेट याची पत्नी— आपला नवरा कधींही शरण जाणार नाहीं अशी तिची खातरी आहे. त्यानें शत्रुच्या स्वाधीन व्हावें यापेक्षां त्यास मृत्यु आला तरी मला पत्करलें असें स्पष्ट सांगितलें.

निमंत्रण--चक्रवर्ती बादशहा एडवर्ड यांस राज्याभिषेक तारीख २६ जून रोजी होणार आहे तेव्हां त्या समारंभासाठीं मुंबई इलाख्यांतील खालील श्रेष्ठ मंडळीस निमंत्रण पत्रिका धाडण्यांत आल्या आहेत.

श्रीमंत छत्रपती महाराज—कोल्हापूर.
सर जेम शेटजी जीजीभाई—मुंबई शहर
नामदार सरदार गणपतराव माधवराव विंचूरकर—मुंबई इलाखा.

निमंत्रणाचा बहुमान आमच्या वऱ्हाडांत कोणाला देतात याचा कांहीं खुलासा अजून कळलाच नाहीं. वऱ्हाड प्रांताचें विस्मरण मात्र न होंवो!

कालाचें चक्र अबाधितपणें फिरतें आणि ह्याच्या सपाट्यांत सर्वच आहेत आणि ह्मणूनच सर्व लय पावतात. नुकतेच सर रिचर्ड टेंपल साहेब वारल्याचें वर्तमान कळलें! हे गेल्या सोमवारी निवर्तले. हे मुंबई इलाख्यांत मोठ्या प्रख्यातीला आलेले गव्हरनर होत.

वृथाभिमान— चाफेकर प्रकरण उपस्थित झाल्यापासून पुण्यास पोलिसांत कित्येक गोरे लोक चिकटले आहेत. यांस काळ्या अमलदारांस सलाम करण्याची लाज वाटते, नियमाप्रमाणें तर सलाम केलेच पाहिजेत. यास उपाय काय करावा, अशी तक्रार विलायतेंतील टुथ पत्रांत एकानें केली आहे.

पिकाची कापणी करणारें यंत्र— शेतांत तयार झालेल्या पिकांची कापणी करून त्याचे गठ्ठे बांधण्याचें एक यंत्र अमेरिकन लोकांनीं शोधून काढिलें आहे त्या यंत्राला दोन घोडे जुंपतात व त्याजवर एक मनुष्य बसतो. जसजसे घोडे पुढें चालतात तसे तसे तें यंत्र धान्य कापून त्याचे गठ्ठ बांधीत जातें. अमेरिकन लोकांच्या अकलेची कमाल आहे खरी!!

अतिउष्णप्रदेश— इराणी अखातच्या दक्षिण आणि पश्चिम भागामध्यें जी उष्णता आहे, ती जगांत दुसऱ्या कोठेंही नाहीं. जुलई, आगष्ट महिन्यात पारा १३० डिग्री पर्यंत चढतो. पाण्याची अति टंचाई होते. ५०० फूट पावेतो जमीन खोदली तरी पाण्याचा थेंब मिळत नाहीं.

स्त्रियांचें प्रदर्शन.—न्यूयार्कमध्यें सुंदर स्त्रियांचे प्रदर्शन होऊन सुंदर स्त्रीस पहिलें बक्षीस मिळत असतें. गेल्या प्रदर्शनांत हें बक्षीस एका अंधळ्या स्त्रीस मिळालें. ही स्त्री सुरूप व अंधळी असूनही तिचे डोळे इतके सुरेख असत कीं ती अंधळी आहे ही कल्पना कोणासही करितां आली नाहीं.

---

मानेंत शिंग—वेळगांव येथील इनाम वल्लद नूरअहमद यास लहानपणापासून मानेस लागून उजव्या खांद्यावर आवाळू होतें. ते चार वर्षांपूर्वीं फुटून त्यांतून एक शिंग बाहेर आलें. हें शिंग नुक्तेंच कापून टाकण्यात आलें. आश्चर्य आहे.

हंसविणारें झाड— अरबस्थानांत या झाडाची उत्पत्ति आहे. याची उंची मध्यम असते. फुलें पिवळीं असतात. आणि शेंगांत काळ्या बिया असतता. या बिया दळून त्याचें पीठ खाल्लें, तर खाणाऱ्याची वृत्ति फार विलक्षण होत. हसावें, उडावें, बागडावें आणि ओरडत किंवा मेंढ्यानें गात सुटावें अशीच वृत्ति बनते. हा प्रकार सुमारें तास दीड तास चालून शेवटीं मनुष्य अगदीं दमून जातो, व त्या शीणानें त्यास झोंप लागते जागा झाल्यावर आपण काय चेष्टा केल्या याचें त्यास स्मरण सुद्धां राहत नाहीं. या झाडास अद्यापि वनस्पतिशास्त्रांत नांव वगैरे देऊन त्याचें जातिविवेचन व वर्गीकरण झालेलें नाहीं.

सूचना— यंदाची राष्ट्रीय सभा मागें प्रसिद्ध केल्याप्रमाणें अमदाबादेस भरण्याचे नक्की ठरलें आहे. राष्ट्रीय सभेची बैठक संपतांच १२ दिवसांनीं ह्मणजे तारीख १ जानेवारी १९०३ रोजीं दिल्ली येथें राज्यारोहणसमारंभ व्हावयाचा आहे त्यामुळें दिल्लीस जाणाऱ्या लोकांची गैरसोय होईल यासाठीं राष्ट्रीय सभा नेहमींच्या तारखेच्या बरेच दिवस आधी भरावी अशी कित्येकांनीं सूचना केली आहे. आ.व.

---

### नोटीस

बेशमी छगनलाल ऊर्फ सुगनलाल लछमनदास श्रावगी गुमास्ते कुलमुखत्यार हल्लीं वस्ती जामोद यांसः—

नोटीस खालीं सही करणार याजकडून देण्यांत येते कीं तुह्मी आमचे दुकानावर गुमास्त्याचें व कुलमुखत्यारीचें काम केलें व संमत १९५८ चे मित्ती कार्तिक शुद्ध १५ मेस तुह्मास दुकान संबंधी हिशोब मागितला असतां समजून देत नाहीं व त्यांत घोटाळा आहे असें आह्मास दिसून आलें आहे. तर ही नोटीस पावल्यापासून तुमची नौकरी बंद व मुखत्यारपत्रही रद्द केलें आहे. तर नोटीस पावल्या पासून आठ दिवसाचे आंत आमचे दुकानचा चार्ज समजून देणें व आमची सहीची पावती घेणें व दुकानसंबंधी असामी वगैरे कोणतेच प्रकारें खर्च लागेल तो तुमचेवर व तुमच्या इस्टेट वारसास लागू असे. तसे न केल्यास सर्व प्रकारे दुकानचा बोजा तुमचेवर आहे आणि नोटिशीचा खर्च तुमचेवर आहे. कळावें ता. २२।३।१९०२ इसवी.

सही

घन्नालाल टुकडदास साहू राहणार
जामोद तालुके जळगांव
(वऱ्हाड)

---

## नोटीस.

बेशमी सारजाबाई जवजें विठ्ठलराव कुळकर्णी राहणार रायपूर ता० चिखली यांसः—

मी या लेखानें कळवितों कीं आपण आमचें वडिलोपार्जित घर विकण्याच्या विचारांत आहात, तर तें विकण्याचा वगैरे कोणासच हक्क नाहीं. तर आपण या रिकाम्या भानगडींत पडूं नये कळावें. तारीख २० मार्च १९०२ इ. सही.

नारायण गजानन कुळकर्णी
रायपूरकर.

---

### जाहिरात

सर्व लोकस कळविले जाते कीं, आमचें रायपूर येथील वडिलोपार्जित घर आमची भावजय सारजाबाई ही विकणार आहे तर ते कोणी विकत, गहाण, बक्षीस वगैरे घेऊं नये घेतल्यास त्याची जबाबदारी ज्याची त्याजवर राहील, कळावें. तारीख २० मार्च १९०२ इसवी. सही

नारायण गजानन कुळकर्णी
रायपूरकर.

---

### नोटीस.

रा० रा० वासुदेव गणेश आपरकार नाईक साहू दुकान अकोट. यांना.

रंगुबाई जवजे नारायण पाटील राहणार अकोट शनवारपेठ इजकडून विनंती करण्यांत येते कीं, माझी माते श्री पार्वतीबाई चांदीकर ही मरण पावल्यावर तिजला मजशिवाय दुसरें कोणी वारस नाहीं व नव्हते ह्मणून तिची सर्व जिंदगी वगैरे मजला मिळाली व ताब्यांतही आली परंतु तिचे नग डागिनें मी अज्ञान असल्यामुळें कांहीं लोकांचे समोर तुर्त ते मजला न देतां अनामत ठेवावे व सज्ञान झाल्यावर मजला द्यावे असें लोकांचे समक्ष ठरवून डागिन्याची यादी करून त्याजवर आपली सही करून पंचाच्या सहीनिशी यादी मजला देऊन आपले जवळ डागिनें अनामत मजला देण्या करितां ठेवले. मी हल्लीं सज्ञान झाले आहे या करितां माझे मातोश्रीचे डागिनें नग यादी बरहुकूम तुमचे जवळ असलेले, बहुत वेळा मागितले परंतु तुह्मी दिले नाहींत ह्मणून ह्या लेखीपत्रावरून विनंती करीत आहे कीं ही नोटीस पावल्या पासून आठ दिवसाचे आंत यादी बरहुकूम माझे आईचे डागिने मजला आणून देऊन माझी पावती घ्यावी. असें न केल्यास मजला रितीप्रमाणें व्यवस्था करावी लागेल. कळावे ही विनंती तारीख १७।३।०२ इसवी. सही

रंगुबाई जवजे नारायणराव पाटील
अकोट निशाणी खुद्द हातची
बांगडी असे. दस्तुर नारायण
बापूराव पाटील.

---

☞ हे पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यानीं छापून प्रसिद्ध केलें.